भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५०

(सन १९५० चा अधिनियम क्रमांक ४३)

[ १ जून १९९८ रोजी यथाविद्यमान ]

# The Representation of the People Act, 1950

(Act No. 43 of 1950)

[*As in force on the 1st June 1998*]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००४ यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००७

[किंमत : १८.०० रुपये]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ जून, १९९८ रोजी यथाविद्यमान असलेला दि रिप्रेझेंटेशन ऑफ पिपल ॲक्ट, १९५० याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ९, अंक ३, दिनांक १५ ऑक्टोबर, १९९८ यात पृष्ठ २७० ते २९१ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्रधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक १५ ऑक्टोबर १९९८

**डॉ. रघबीर सिंग,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of The Representation of the People Act, 1950 as on the 1st June, 1998 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 3, Vol. 9, dated 15th October, 1998 on pages 270 to 291.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated the 15th October 1998.

Dr. RAGHBIR SINGH,
Secretary to the Government of India.

**विशोधन अधिनियम व अनुकूलन आदेश यांची सूची**

१. ' लोकप्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९५० ' (१९५० चा ७३).
२. ' लोकप्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९५१ ' (१९५१ चा २७).
३. ' भाग ग राज्यांचे शासन अधिनियम, १९५१ ' (१९५१ चा ६७).
४. ' लोकप्रतिनिधित्व (दुसरे विशोधन) अधिनियम, १९५१ ' (१९५१ चा ६७).
५. ' आंध्र राज्य अधिनियम, १९५३ ' (१९५३ चा ३०).
६. ' हिमाचल प्रदेश व बिलसपूर (नवीन राज्य) अधिनियम, १९५४ ' (१९५४ चा ३२).
७. ' चंदरनगर (विलीनीकरण) अधिनियम, १९५४ ' (१९५४ चा ३६).
८. ' लोकप्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९५६ ' (१९५६ चा २).
९. ' लोकप्रतिनिधित्व (तिसरे विशोधन) अधिनियम, १९५६ ' (१९५६ चा ६०).
१०. ' लोकप्रतिनिधित्व (चौथे विशोधन) अधिनियम, १९५६ ' (१९५६ चा ७२).
११. ' प्रादेशिक परिषदा अधिनियम, १९५६ ' (१९५६ चा १०३).
१२. ' विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ '.
१३. ' विधि अनुकूलन (क्रमांक ३) आदेश, १९५६ '.
१४. ' विधानपरिषदा अधिनियम, १९५७ ' (१९५७ चा ३७).
१५. ' नागा टेकड्या ट्यूएनसांग क्षेत्र अधिनियम, १९५७ ' (१९५७ चा ४२).
१६. ' दिल्ली नगरपालिका अधिनियम, १९५७ ' (१९५७ चा ६६).
१७. ' लोकप्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९५८ ' (१९५८ चा ५८).
१८. ' आंध्र प्रदेश व मद्रास (सीमांमध्ये फेरबदल), १९५९ ' (१९५९ चा ५६).
१९. ' मुंबई पुनर्रचना अधिनियम, १९६० ' (१९६० चा ११).
२०. ' लोकप्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९६० ' (१९६० चा २०).
२१. ' निरसन व विशोधन अधिनियम, १९६० ' (१९६० चा ५८).
२२. ' दादरा व नगरहवेली अधिनियम, १९६१ ' (१९६१ चा ३५).
२३. ' लोकप्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९६१ ' (१९६१ चा ४०).
२४. ' गोवा, दमण व दीव (प्रशासन) अधिनियम, १९६२ ' (१९६२ चा १).
२५. ' नागालँड राज्य अधिनियम, १९६२ '(१९६२ चा २७).
२६. ' लोकप्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९६३ ' (१९६३ चा २).
२७. ' संघ राज्यक्षेत्र शासन अधिनियम, १९६३ ' (१९६३ चा २०).
२८. ' लोकप्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९६४ ' (१९६४ चा ३३).
२९. ' लोकप्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९६५ ' (१९६५ चा १४).
३०. ' संघ राज्यक्षेत्र (लोकसभेची प्रत्यक्ष निवडणूक) अधिनियम, १९६५ ' (१९६५ चा ४९).
३१. ' दिल्ली प्रशासन अधिनियम, १९६६ ' (१९६६ चा १९).
३२. ' दिल्ली नगरपालिका (विशोधन) अधिनियम, १९६६ ' (१९६६ चा ३१).
३३. ' लोकप्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९६६ ' (१९६६ चा ४७).
३४. १९६८ चा अधिनियम ६१.
३५. १९६९ चा अधिनियम २०.
३६. १९६९ चा अधिनियम ४६.
३७. ' मद्रास राज्य (नामांतर) (संघसूचीतील विषयांवरील कायद्यांचे अनुकूलन) आदेश, १९७० '.
३८. ' म्हैसूर राज्य (नामांतर) (संघसूचीतील विषयांवरील कायद्यांचे अनुकूलन) आदेश, १९७४ '.
३९. ' ईशान्य क्षेत्रे (पुनर्रचना) (संघसूचीतील विषयांवरील कायद्यांचे अनुकूलन) आदेश, १९७४ '.
४०. १९७५ चा अधिनियम २९.
४१. १९७६ चा अधिनियम १०.
४२. १९७६ चा अधिनियम ८८.

४३. १९८० चा अधिनियम ८.

४४. १९८५ चा अधिनियम ३४.

४५. १९८६ चा अधिनियम ३४.

४६. १९८६ चा अधिनियम ४०.

४७. ' तामिळनाडू विधानपरिषद (निरास) अधिनियम, १९८६ ' (१९८६ चा ४०).

४८. १९८६ चा अधिनियम ६९.

४९. १९८७ चा अधिनियम १८.

५०. १९८७ चा अधिनियम ३१.

५१. १९८७ चा अधिनियम ३८.

५२. १९८७ चा अधिनियम ४०.

५३. १९८९ चा अधिनियम १.

५४. १९८९ चा अधिनियम २१.

५५. १९९२ चा अधिनियम १.

५६. १९९२ चा अधिनियम ३८.

५७. १९९६ चा अधिनियम २१.

५८. १९९६ चा अधिनियम २९.

# लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५०

## कलमांचा क्रम

कलमे

भाग एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव.

२. व्याख्या.

भाग दोन

**जागांचे वाटप व मतदारसंघांचे परिसीमन**

**लोकसभा**

३. लोकसभेतील जागांचे वाटप.

४. लोकसभेतील जागा भरणे व संसदीय मतदारसंघ.

५-६. [निरसित].

**राज्य विधानसभा**

७. विधानसभांमधील जागांची एकूण संख्या व विधानसभा मतदारसंघ.

७क. सिक्किम विधानसभेतील जागांची एकूण संख्या व विधानसभा मतदारसंघ.

**संसदीय व विधानसभा मतदारसंघ परिसीमन आदेश**

८. परिसीमन आदेशांचे संकलन.

९. परिसीमन आदेश अद्ययावत ठेवण्याची निवडणूक आयोगाची शक्ती.

९क. निवडणूक आयोगाची विवक्षित राज्यांमध्ये अनुसूचित जनजातींसाठी राखीव मतदारसंघ निश्चित करण्याची शक्ती.

९ख. निवडणूक आयोगाची त्रिपुरा राज्यामध्ये अनुसूचित जनजातींसाठी राखीव मतदारसंघ निश्चित करण्याची शक्ती.

**राज्य विधानपरिषदा**

१०. विधानपरिषदांमधील जागांचे वाटप.

११. विधानपरिषद मतदारसंघाचे परिसीमन.

**मतदारसंघांचे परिसीमन करणाऱ्या आदेशांबाबत उपबंध**

१२. आदेशांत फेरबदल किंवा विशोधन करण्याची शक्ती.

१३. मतदारसंघाचे परिसीमन करणाऱ्या आदेशांबाबतची प्रक्रिया.

भाग दोन-क

**अधिकारी**

१३क. मुख्य निर्वाचन अधिकारी.

१३कक. जिल्हा निवडणूक अधिकारी.

१३ख. मतदार नोंदणी अधिकारी.

१३ग. सहायक मतदार नोंदणी अधिकारी.

१३गग. मुख्य मतदान अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी इ. निवडणूक आयोगाकडे प्रतिनियुक्तीवर असल्याचे मानण्यात येणे.

कलमे

भाग दोन-ख

**संसदीय मतदारसंघासाठी मतदार याद्या**

१३घ. संसदीय मतदारसंघांसाठी मतदार याद्या.

भाग तीन

**विधानसभा मतदारसंघांसाठी मतदार याद्या**

१४. व्याख्या.

१५. प्रत्येक मतदारसंघाची मतदार यादी.

१६. मतदार यादीत नोंदणी होण्याबाबत निरर्हता.

१७. कोणत्याही व्यक्तीची एकापेक्षा अधिक मतदारसंघांमध्ये नोंदणी करावयाची नाही.

१८. कोणत्याही व्यक्तीची कोणत्याही मतदारसंघामध्ये एकापेक्षा अधिक वेळा नोंदणी करावयाची नाही.

१९. नोंदणीच्या शर्ती.

२०. " सर्वसामान्यपणे रहिवासी " याचा अर्थ.

२१. मतदार याद्या तयार करणे व सुधारणे.

२२. मतदार यादीतील नोंदीची दुरुस्ती.

२३. मतदार यादीत नावांचा समावेश करणे.

२४. अपिले.

२५. अर्ज व अपिले यांसाठी फी.

२५क. सिक्कीममधील संघ मतदारसंघात मतदार म्हणून नोंदणी करण्याबाबतच्या शर्ती.

भाग चार

**विधानपरिषद मतदारसंघांसाठी मतदार याद्या**

२६. [निरसित].

२७. विधानपरिषद मतदारसंघासाठी मतदार याद्या तयार करणे.

भाग चार-क

**राज्यसभेतील ज्या जागा संघ राज्यक्षेत्रांच्या प्रतिनिधींनी भरावयाच्या त्या जागा भरण्याची रीत**

२७क. राज्यसभेत संघ राज्यक्षेत्रांना वाटून दिलेल्या जागा भरण्यासाठी निर्वाचकगण बनवणे.

२७ख. [निरसित].

२७ग. [निरसित].

२७घ. [निरसित].

२७ङ. [निरसित].

२७च. [निरसित].

२७छ. विवक्षित निरर्हतांमुळे निर्वाचकगणाच्या सदस्यत्वाची समाप्ती.

२७ज. राज्यसभेत संघ राज्यक्षेत्राला वाटून दिलेल्या जागा भरण्याची रीत.

२७झ. [निरसित].

२७ञ. निर्वाचकगणांमधील जागा रिकाम्या असल्या तरी निवडून देण्याची त्यांची शक्ती.

२७ट. [निरसित].

भाग पाच

**सर्वसाधारण**

२८. नियम करण्याची शक्ती.

२९. स्थानिक प्राधिकरणांचा कर्मचारीवर्ग उपलब्ध करून देणे.

३०. दिवाणी न्यायालयांच्या अधिकारितेला आडकाठी असणे.

३१. खोटी अधिकथने करणे.

३२. मतदार याद्या तयार करणे, इत्यादींच्या संबंधातील पदीय कर्तव्याचा भंग.

पहिली अनुसूची—लोकसभेतील जागांचे वाटप.

दुसरी अनुसूची—विधानसभांमधील जागांची एकूण संख्या.

तिसरी अनुसूची—विधानपरिषदांतील जागांचे वाटप.

चौथी अनुसूची—विधानपरिषदांच्या निवडणूकीच्या प्रयोजनासाठी स्थानिक प्राधिकरणे.

पाचवी अनुसूची—[निरसित].

सहावी अनुसूची—[निरसित].

सातवी अनुसूची—[निरसित].

# लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५०

## (१९५० चा अधिनियम क्रमांक ४३)

(१ जून, १९९८ रोजी यथाविद्यमान)

[ १२ मे, १९५० ]

**लोकसभा व राज्यांची विधानमंडळे यांतील जागा वाटून देणे व त्यांच्या निवडणुकीसाठी मतदारसंघांचे परिसीमन करणे, अशा निवडणुकीतील मतदारांच्या अर्हता, मतदार-याद्या तयार करणे, [१][ राज्यसभेतील ज्या जागा [२][ संघ राज्यक्षेत्रांच्या ] प्रतिनिधींनी भरावयाच्या त्या भरण्याची रीत ] आणि त्यांच्याशी संबंधित बाबी यांकरिता उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

भाग एक

**प्रारंभिक**

१. या अधिनियमास ' लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० ' असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव.**

२. [३]* * * या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— **व्याख्या.**

(क) " अनुच्छेद " याचा अर्थ, संविधानाचा अनुच्छेद, असा आहे ;

(ख) " विधानसभा मतदारसंघ " याचा अर्थ, राज्याच्या विधानसभेच्या निवडणुकींच्या प्रयोजनार्थ [४][ कायद्याद्वारे ] निर्मिलेला मतदारसंघ, असा आहे ;

(ग) " विधानपरिषद मतदारसंघ " याचा अर्थ, राज्याच्या विधानपरिषदेच्या निवडणुकींच्या प्रयोजनार्थ [५][ कायद्याद्वारे ] निर्मिलेला मतदारसंघ, असा आहे ;

[६]* * * * *

(घ) " निवडणूक आयोग " याचा अर्थ, अनुच्छेद ३२४ खाली राष्ट्रपतीने नियुक्त केलेला निवडणूक आयोग, असा आहे ;

(ङ) " आदेश " याचा अर्थ, **शासकीय राजपत्रात** प्रकाशित केलेला आदेश, असा आहे ;

(च) " संसदीय मतदारसंघ " याचा अर्थ, लोकसभेच्या निवडणुकींच्या प्रयोजनार्थ [७][ कायद्याद्वारे ] निर्मिलेला मतदारसंघ, असा आहे ;

[८]* * * * *

(छ) " व्यक्ति " यात व्यक्ति-निकायाचा समावेश नाही ;

(ज) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

[९][ (झ) " राज्य " यात संघ राज्यक्षेत्राचा समावेश आहे ; ]

---

१. १९५० चा अधिनियम ७३, कलम २ द्वारे समाविष्ट केले.

२. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ द्वारे, " भाग ग राज्याच्या " या मजकुराऐवजी दाखल केला.

३. १९५६ चा अधिनियम १०३, कलम ६५ द्वारे " (१) " हा कंस व आकडा गाळला.

४. १९५६ चा अधिनियम २, कलम २ द्वारे " कलम ९ खाली काढलेल्या आदेशाद्वारे " या मजकुराऐवजी दाखल केला.

५. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ द्वारे " कलम ११ खाली काढलेल्या आदेशाद्वारे " या मजकुराऐवजी दाखल केला.

६. १९५६ चा अधिनियम १०३, कलम ६५ द्वारे खंड (गग) गाळला.

७. १९५६ चा अधिनियम २, कलम २ द्वारे " कलम ६ द्वारे किंवा त्याखाली काढलेल्या आदेशाद्वारे " या मजकुराऐवजी दाखल केला.

८. १९५१ चा अधिनियम ६७, कलम २ द्वारे खंड (चच) समाविष्ट केला होता. " ईशान्य क्षेत्रे " (पुनर्रचना) (संघसूचीतील विषयांवरील कायद्यांचे अनुकूलन) आदेश, १९७४ द्वारे गाळला (२१ जानेवारी, १९७२ रोजी व तेव्हापासून).

९. " ईशान्य क्षेत्रे (पुनर्रचना) (संघसूचीतील विषयांवरील कायद्यांचे अनुकूलन) आदेश, १९७४ " द्वारे खंड (झ) ऐवजी दाखल केला.

(ञ) "राज्य शासन" याचा संघ राज्यक्षेत्राच्या संबंधातील अर्थ त्याचा प्रशासक, असा आहे.

[१]* * * * *

भाग दोन

## जागांचे वाटप व मतदारसंघाचे परिसीमन

### लोकसभा

**लोकसभेतील जागांचे वाटप.**

[२][**३.** लोकसभेत राज्यांना करावयाचे जागा वाटप आणि प्रत्येक राज्याच्या अनुसूचित जातींकरिता व अनुसूचित जनजातींकरिता काही जागा राखून ठेवावयाच्या असल्यास त्यांची संख्या पहिल्या अनुसूचीत दाखविल्याप्रमाणे असेल.

**लोकसभेतील जागा भरणे व संसदीय मतदारसंघ.**

**४.** [३]* * * * *

[४][ (२) राज्यांना कलम ३ खाली वाटून दिलेल्या, लोकसभेतील अन्य सर्व जागा राज्यांतील संसदीय मतदारसंघातून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडून आलेल्या व्यक्तींनी भरावयाच्या जागा असतील. ]

(३) पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेला प्रत्येक संसदीय मतदारसंघ हा एकसदस्य मतदारसंघ असेल.

(४) कलम ३ खाली ज्याला फक्त एक जागा देण्यात आली आहे असे प्रत्येक राज्य म्हणजे एकेक संसदीय मतदारसंघ होईल.

[५][(५) पोटकलम (४) मध्ये उपबंधित केले असेल तेवढे वगळता एरव्ही अरुणाचल प्रदेश या संघ राज्यक्षेत्रातील संसदीय मतदारसंघाखेरीज इतर सर्व मतदारसंघांचा विस्तार 'परिसीमन अधिनियम, १९७२' (१९७२ चा ७६) याच्या उपबंधान्वये परिसीमन आयोगाने काढलेल्या आदेशांद्वारे ठरविण्यात आल्याप्रमाणे असेल आणि अरुणाचल प्रदेश या संघ राज्यक्षेत्रातील संसदीय मतदारसंघांचा विस्तार हा 'संघ राज्यक्षेत्रे शासन अधिनियम, १९६३' (१९६३ चा २०) याच्या उपबंधान्वये निवडणूक आयोगाने काढलेल्या आदेशाद्वारे ठरविण्यात आल्याप्रमाणे असेल. ] ]

**५.** [संसदीय मतदारसंघ.] 'लोकप्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९५६' (१९५६ चा २) कलम (४) द्वारे निरसित.

**६.** [ संसदीय मतदारसंघांचे परिसीमन. ] 'विधी अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६' द्वारे निरसित.

### राज्य विधानसभा

**विधानसभांमधील जागांची एकूण संख्या व विधानसभा मतदारसंघ.**

[६][**७.** (१) [७][ [८][ [९][ पोटकलम (१क), (१ख) आणि (१ग) ] च्या उपबंधाच्या अधीनतेने, ] दुसऱ्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक राज्याच्या विधानसभेत जितक्या जागा विधानसभा मतदारसंघांतून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडून आलेल्या व्यक्तींनी भरावयाच्या त्या जागांची एकूण संख्या, ] आणि राज्याच्या अनुसूचित जातींकरिता व अनुसूचित जनजातींकरता काही जागा राखून ठेवावयाच्या असल्यास त्यांची संख्या त्या अनुसूचीत दाखवल्याप्रमाणे असेल :

---

१. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ द्वारे पोटकलम २ गाळले.

२. १९६६ चा अधिनियम ४७, कलम २ द्वारे कलमे ३ व ४ यांऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

३. १९७५ चा अधिनियम २९, कलम ११ द्वारे पोटकलम (१) गाळले (१५ ऑगस्ट, १९७५ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१५ ऑगस्ट, १९७५ रोजी व तेव्हापासून).

५. १९७६ चा अधिनियम ८८, कलम २ द्वारे मूळ पोटकलम (५) ऐवजी दाखल केले (२ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

६. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ४ द्वारे कलम ७ ऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून). मूळ कलमे ८ व ९ ही अनुक्रमे १९५६ चा अधिनियम २, कलम ५ आणि विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ यांद्वारे निरसित केली होती.

७. १९८० चा अधिनियम ८, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

८. १९९२ चा अधिनियम ३८, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (५ डिसेंबर, १९९२ रोजी व तेव्हापासून).

९. १९८७ चा अधिनियम ४०, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२२ सप्टेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

परंतु, अनुच्छेद ३७१ क च्या खंड (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कालावधीसाठी नागालँड राज्याच्या विधानसभेला वाटून दिलेल्या जागांची एकूण संख्या [१][ बावन्न ] असेल, व त्यापैकी—

(क) [१][ बारा जागा ] ट्युएनसंग जिल्ह्याला वाटून दिल्या जातील व त्या अनुच्छेदात निर्दिष्ट केलेल्या प्रादेशिक परिषदेचा विचार घेतल्यानंतर राज्यपाल **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा रीतीने त्या परिषदेच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेल्या व्यक्ती त्या जागा भरतील ; आणि

(ख) बाकीच्या चाळीस जागा त्या राज्याच्या उर्वरित भागातील विधानसभा मतदारसंघांमधून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडून आलेल्या व्यक्ती त्या जागा भरतील.

[२][ (१क) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ' लोकप्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९८० ' याच्या प्रारंभानंतर कोणत्याही वेळी घटित करण्यात यावयाच्या सिक्कीम राज्य विधानसभेतील ज्या जागा विधानसभा मतदारसंघांतून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडून आलेल्या व्यक्तींनी भरावयाच्या आहेत त्या जागांची एकूण संख्या बत्तीस असेल आणि त्यांपैकी—

(क) दोन जागा भूतिया, लेपचा कुळातील सिक्कीमी व्यक्तींकरता राखीव असतील ;

(ख) दोन जागा त्या राज्यातील अनुसूचित जातींकरता राखीव असतील ;

(ग) एक जागा कलम २५क मध्ये निर्देशिलेल्या संघांकरता राखीव असेल.

**स्पष्टीकरण.—** या पोटकलमात " भूतिया " या शब्दात चुंबिपा, दोपूथापा, दुक्पा, कागाडे, शेर्पा तिबेटी, त्रोमोपा व योल्मो यांचा समावेश आहे. ]

[३][ (१ख) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, लोकप्रतिनिधित्व (तिसरे विशोधन) अधिनियम, १९८७ (१९८७ चा ४०) याच्या प्रारंभानंतर कोणत्याही वेळी घटित करण्यात यावयाच्या अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोराम आणि नागालँड राज्यांच्या विधानसभेत—

(क) अरुणाचल प्रदेश राज्याच्या विधानसभेत अनुसूचित जनजातींसाठी एकोणचाळीस जागा राखून ठेवण्यात येतील ;

(ख) मेघालय राज्याच्या विधानसभेत अनुसूचित जनजातींसाठी पंचावन्न जागा राखून ठेवण्यात येतील ;

(ग) मिझोराम राज्याच्या विधानसभेत अनुसूचित जनजातींसाठी एकोणचाळीस जागा राखून ठेवण्यात येतील ;

(घ) नागालँड राज्याच्या विधानसभेत अनुसूचित जनजातींसाठी एकोणसाठ जागा राखून ठेवण्यात येतील. ]

[४][(१ग) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, लोकप्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९९२ याच्या प्रारंभानंतर कोणत्याही वेळी घटित करण्यात यावयाच्या त्रिपुरा राज्याच्या विधानसभेत अनुसूचित जनजातींसाठी बारा जागा राखून ठेवण्यात येतील. ]

(२) [५][ पोटकलम (१) किंवा पोटकलम (१क) मध्ये ] निर्दिष्ट केलेला प्रत्येक विधानसभा मतदारसंघ हा एकसदस्य मतदारसंघ असेल.

[६][ (३) [५][ सिक्कीम राज्य व अरुणाचल प्रदेश हे संघ राज्यक्षेत्र यांतील विधानसभा मतदारसंघ वगळता सर्व राज्ये व संघ राज्यक्षेत्रे यांमधील प्रत्येक विधानसभा मतदारसंघाचा विस्तार ] ' परिसीमन अधिनियम, १९७२ ' (१९७२ चा ७६) याच्या उपबंधांन्वये परिसीमन आयोगाने काढलेल्या आदेशांद्वारे ठरवून देण्यात आल्याप्रमाणे असेल ; [२][ सिक्कीम राज्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघाचा विस्तार ' लोकप्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९८० ' याच्या कलम ४ द्वारे विशोधित करण्यात आला तसा संसदीय व विधानसभा मतदारसंघ परिसीमन आदेश, १९७६ ' यात उपबंधित केल्याप्रमाणे असेल ] आणि अरुणाचल प्रदेश या संघ राज्यक्षेत्रातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघाचा विस्तार ' संघ राज्यक्षेत्र शासन अधिनियम, १९६३ ' (१९६३ चा २०) याच्या उपबंधान्वये निवडणूक आयोगाने काढलेल्या आदेशाद्वारे ठरवून देण्यात आल्याप्रमाणे असेल. ] ]

---

१. १९६८ चा अधिनियम ६१, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

२. १९८० चा अधिनियम ८, कलम २ द्वारे समाविष्ट केले (१ सप्टेंबर, १९८० रोजी व तेव्हापासून).

३. १९८७ चा अधिनियम ४०, कलम २ द्वारे समाविष्ट केले (२२ सप्टेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

४. १९९२ चा अधिनियम ३८, कलम २ द्वारे समाविष्ट केले (५ डिसेंबर, १९९२ रोजी व तेव्हापासून).

५. १९८० चा अधिनियम ८, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१ सप्टेंबर, १९८० रोजी व तेव्हापासून).

६. १९७६ चा अधिनियम ८८, कलम ३ द्वारे मूळ पोटकलम (३) ऐवजी समाविष्ट केले (२ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).

सिक्कीम विधानसभेतील जागांची एकूण संख्या व विधानसभा मतदारसंघ.

[१][**७क.** (१) कलम ७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सिक्कीम राज्यांच्या 'संविधान (छत्तिसावे विशोधन) अधिनियम, १९७५' अन्वये रीतसर घटित करण्यात आलेली त्या राज्याची विधानसभा असल्याचे मानण्यात येणाऱ्या ] विधानसभेत विधानसभा मतदारसंघातून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडण्यात आलेल्या व्यक्तींनी भरावयाच्या जागांची संख्या ३२ असेल.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेला प्रत्येक विधानसभा मतदारसंघ हा एकसदस्य मतदारसंघ असेल.

(३) अशाप्रकारे रीतसर घटित करण्यात आल्याचे मानण्यात येणाऱ्या विधानसभेत प्रत्येक मतदार-संघाचा विस्तार व राखीव जागांचे प्रमाण हे 'संविधान (छत्तिसावे विशोधन) अधिनियम, १९७५' याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी उपबंधित केल्याप्रमाणे असेल. ]

## संसदीय व विधानसभा मतदारसंघ परिसीमन आदेश

परिसीमन आदेशांचे संकलन.

**८.** (१) कलम ४, पोटकलम (५) मध्ये किंवा कलम ७ च्या पोटकलम (३) मध्ये निर्दिष्ट असे परिसीमन आयोगाने किंवा, प्रकरणपरत्वे, निवडणूक आयोगाने काढलेले सर्व आदेश **शासकीय राजपत्रात** प्रकाशित झाल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, अशा आदेशांमध्ये दिलेले संसदीय व विधानसभा मतदारसंघांचे वर्णन अद्ययावत करण्यासाठी स्वतःला आवश्यक वाटतील अशी विशोधने करून निवडणूक आयोग असे सर्व आदेश [२][ 'संसदीय व विधानसभा मतदारसंघाचे परिसीमन आदेश, १९७६' ] म्हणून संबोधावयाच्या अशा एकाच आदेशाच्या रूपाने संकलित करील आणि त्या आदेशाच्या अधिप्रमाणित प्रती केंद्र शासनाकडे आणि जेथे जेथे विधानसभा आहे अशा प्रत्येक राज्याकडे पाठवील, आणि तद्नंतर कलम ४ च्या पोटकलम (५) किंवा कलम ७ च्या पोटकलम (३) मध्ये निर्दिष्ट असे सर्व आदेश त्या आदेशामुळे निष्प्रभावी होतील आणि त्या आदेशांस कायद्याचे बळ असेल व न्यायालयात त्यांना आक्षेप घेता येणार नाही.

(२) उक्त आदेश केंद्र शासनाकडे किंवा एखाद्या राज्याच्या शासनाकडे आल्यावर शक्य होईल तितक्या लवकर, ते ते शासन तो आदेश लोकसभेसमोर किंवा, प्रकरणपरत्वे, त्या राज्याच्या विधानसभेसमोर ठेवील.

[३][ (३) कलम ४ च्या पोटकलम (५) मध्ये किंवा, प्रकरणपरत्वे, कलम ७ च्या पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेल्या आदेशांचे पोटकलम (१) खाली एकत्रिकरण केल्यामुळे संबद्ध असेल असा कोणताही आदेश किंवा कोणतेही आदेश '**भारताचे राजपत्र**' यात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेस अस्तित्वात असलेल्या लोकसभेतील किंवा राज्य विधानमंडळातील प्रतिनिधित्वावर किंवा त्यांच्या क्षेत्रीय मतदारसंघावर, 'परिसीमन अधिनियम, १९७२' (१९७२ चा ७६) याच्या कलम १० पोटकलम (५) मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे कोणताही परिणाम होणार नाही. ]

परिसीमन आदेश अद्ययावत ठेवण्याची निवडणूक आयोगाची शक्ती.

**९.** (१) '**भारताचे राजपत्र**' यात आणि संबंधित राज्यांच्या **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रकाशित करून तीद्वारे, निवडणूक आयोगाला वेळोवेळी—

(क) [४][ 'संसदीय व विधानसभा मतदारसंघाचे परिसीमन आदेश, १९६६', किंवा, प्रकरणपरत्वे, 'संसदीय व विधानसभा मतदारसंघाचे परिसीमन आदेश, १९७६ ] यामधील कोणतीही छपाईची चूक अथवा अनवधानाने, त्यात झालेली कोणतीही चूकभूल दुरुस्त करता येईल ;

[५][ (कक) संसदीय आणि विधानसभा मतदारसंघाचे परिसीमन आदेश, १९७६ यामध्ये, कोणत्याही केंद्रीय अधिनियमान्वये संसदीय किंवा विधानसभा मतदारसंघाबाबत (अशा मतदारसंघांमधील अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जनजाती यांच्यासाठी जागा राखून ठेवणे यासह) काढण्यात आलेला तो आदेश, कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांचे एकत्रिकरण करण्यासाठी त्याला आवश्यक किंवा इष्ट आहे असे दिसून येईल त्याप्रमाणे विशोधने करता येतील. ]

(ख) त्या आदेशात उल्लेखिलेल्या कोणत्याही जिल्ह्याच्या किंवा कोणत्याही प्रादेशिक विभागाच्या सीमांमध्ये किंवा नावात बदल झाल्यास, तो आदेश अद्ययावत करण्यासाठी स्वतःला जरूर वाटतील अशी विशोधने करता येतील.

(२) या कलमाखाली काढलेली प्रत्येक अधिसूचना, ती काढण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, लोकसभेसमोर आणि संबंधित राज्याच्या विधानसभेसमोर ठेवण्यात येईल.

१. १९७६ चा अधिनियम १०, कलम २ व अनुसूची याद्वारे समाविष्ट केले (९ सप्टेंबर, १९७५ रोजी व तेव्हापासून).
२. १९७६ चा अधिनियम ८८, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).
३. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे समाविष्ट केले (२ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).
४. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).
५. १९८९ चा अधिनियम २१, कलम २ द्वारे समाविष्ट केले.

[1][निवडणूक आयोगाची विवक्षित राज्यांमध्ये अनुसूचित जनजातींसाठी राखीव मतदारसंघ निश्चित करण्याची शक्ती.

**९क.** (१) निवडणूक आयोग, लोकप्रतिनिधित्व (दुसरे विशोधन) अधिनियम, १९८७ (१९८७ चा ३८) हा अंमलात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर, संविधानाचे उपबंध आणि परिसीमन अधिनियम, १९७२ (१९७२ चा ७६) याचे कलम ९, पोटकलम (१) खंड (घ) यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले तत्त्व विचारात घेऊन, ज्या मतदारसंघामध्ये अनुसूचित जनजातींसाठी जागा राखून ठेवण्यात येतील ते मेघालय, मिझोराम आणि नागालँड या राज्यांमधील विधानसभा मतदारसंघ निश्चित करील.

(२) निवडणूक आयोग,—

(क) पोटकलम (१) खालील कोणत्याही राज्याच्या बाबतीतील आपले प्रस्ताव **शासकीय राजपत्रात** आणि त्याला योग्य वाटेल अशा इतर रीतीनेही प्रसिद्ध करील ;

(ख) ज्या तारखेस किंवा ज्या तारखेनंतर प्रस्तावावर तो आणखी विचार करील ती तारीख विनिर्दिष्ट करील ;

(ग) अशा विनिर्दिष्ट तारखेपूर्वी प्राप्त होतील त्या सर्व आक्षेपांवर आणि सूचनांवर विचार करील ;

(घ) असा विचार करण्याच्या प्रयोजनार्थ, त्याला तसे करणे योग्य वाटेल तर तो, त्याला योग्य वाटेल अशा राज्यांमध्ये, अशा जागी किंवा अनेक जागी एक किंवा अनेक सार्वजनिक बैठका घेईल ;

(ङ) अशा प्रकारे विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपूर्वी प्राप्त झालेल्या सर्व आक्षेपांवर आणि सूचनांवर विचार केल्यानंतर राज्यांमधील विधानसभा मतदारसंघ ज्या मतदारसंघामध्ये किंवा संघामध्ये अनुसूचित जनजातीसाठी जागा राखून ठेवण्यात येतील तो मतदारसंघ किंवा ते मतदारसंघ आदेशांद्वारे राखून निश्चित करील आणि असा आदेश **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील. अशा प्रसिद्धीनंतर या आदेशाला कायद्याचा पूर्ण प्रभाव राहील आणि कोणत्याही न्यायालयात तो प्रश्नास्पद ठरणार नाही आणि संसदीय व विधानसभा मतदारसंघ परिसीमन आदेश, १९७६ किंवा, प्रकरणपरत्वे, मिझोराम (विधानसभा मतदारसंघ परिसीमन) आदेश, १९८६ हा त्यानुसार विशोधित केला असल्याचे मानण्यात येईल.

(३) पोटकलम (२) अन्वये केलेला प्रत्येक आदेश, या पोटकलमान्वये प्रसिद्ध केल्यानंतर, होईल तितक्या लवकर संबंधित राज्याच्या विधानसभेसमोर मांडला जाईल.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनार्थ, "विधानसभा मतदारसंघ" याचा,—

(क) मेघालय आणि नागालँड राज्यासंबंधातील अर्थ, संसदीय आणि विधानसभा मतदारसंघ परिसीमन आदेश, १९७६ यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या राज्यांचे विधानसभा मतदारसंघ, असा आहे ; आणि

(ख) मिझोराम राज्यासंबंधातील अर्थ, मिझोराम (विधानसभा मतदारसंघ परिसीमन) आदेश, १९८६ यामध्ये विनिर्दिष्ट केलेले विधानसभा मतदारसंघ, असा आहे. ]

[2][ निवडणूक आयोगाची त्रिपुरा राज्यामध्ये अनुसूचित जनजातींसाठी राखीव मतदारसंघ निश्चित करण्याची शक्ती.

९ख. (१) निवडणूक आयोग, लोकप्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९९२ हा अंमलात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर, संविधानाचे उपबंध आणि परिसीमन अधिनियम, १९७२ (१९७२ चा ७६) याचे कलम ९, पोटकलम (१), खंड (घ) यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले तत्त्व विचारात घेऊन ज्या मतदारसंघामध्ये कलम ७, पोटकलम (१ग) द्वारे अनुसूचित जनजातीसाठी जागा राखून ठेवण्यात येतील ते त्रिपुरा राज्यामधील तीन विधानसभा मतदारसंघ निश्चित करील.

(२) निवडणूक आयोग,—

(क) पोटकलम (१) खालील आपले प्रस्ताव **शासकीय राजपत्रात** आणि त्याला योग्य वाटेल अशा इतर रीतीने प्रसिद्ध करील ;

(ख) ज्या तारखेस किंवा ज्या तारखेनंतर प्रस्तावावर तो आणखी विचार करील ती तारीख विनिर्दिष्ट करील ;

(ग) अशा विनिर्दिष्ट तारखेपूर्वी, प्राप्त होतील त्या सर्व आक्षेपांवर आणि सूचनांवर विचार करील ;

(घ) असा विचार करण्याच्या प्रयोजनार्थ, त्याला तसे करणे योग्य वाटेल तर तो, राज्यामध्ये त्याला योग्य वाटेल अशा जागी किंवा अनेक जागी एक किंवा अनेक सार्वजनिक बैठका घेईल ;

(ङ) अशा प्रकारे विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपूर्वी प्राप्त झालेल्या सर्व आक्षेपांवर आणि सूचनांवर विचार केल्यानंतर, राज्यामधील ज्या मतदारसंघामध्ये अनुसूचित जनजातीसाठी अतिरिक्त तीन जागा राखून ठेवण्यात येतील ते तीन विधानसभा मतदारसंघ आदेशांद्वारे निश्चित करील आणि असा आदेश **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील ; आणि अशा प्रसिद्धीनंतर या आदेशाला कायद्याचा पूर्ण प्रभाव राहील आणि कोणत्याही न्यायालयात तो प्रश्नास्पद ठरणार नाही आणि संसदीय व विधानसभा मतदारसंघ परिसीमन आदेश, १९७६ हा त्यानुसार विशोधित केला असल्याचे मानण्यात येईल.

---

१. १९८७ चा अधिनियम ३८, कलम २ द्वारे समाविष्ट केले (२१ सप्टेंबर, १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. १९९२ चा अधिनियम ३८, कलम ३ द्वारे समा[illegible] केले (५ डिसेंबर, १९९२ रोजी व तेव्हापासून).

(३) पोटकलम (२) अन्वये केलेला प्रत्येक आदेश, त्या पोटकलमान्वये प्रसिद्ध केल्यानंतर, होईल तितक्या लवकर, त्रिपुरा राज्याच्या विधानसभेसमोर मांडला जाईल. ]

## राज्य विधानपरिषदा

विधानपरिषदांमधील जागांचे वाटप.

**१०.** (१) ज्या राज्यांमध्ये विधानपरिषदा आहेत त्या राज्यांतील अशा परिषदांमधील जागांचे वाटप तिसऱ्या अनुसूचीत दाखवल्याप्रमाणे होईल.

(२) तिसऱ्या अनुसूचीच्या पहिल्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक राज्याच्या विधानपरिषदेत त्या अनुसूचीच्या दुसऱ्या स्तंभात त्या त्या राज्यासमोर जी संख्या विनिर्दिष्ट केली आहे तितक्या जागा असतील आणि त्या जागांपैकी—

(क) तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्या जागांच्या संख्या या अनुच्छेद १७१ च्या खंड (३) मधील अनुक्रमे उपखंड (क), (ख) व (ग) यांमध्ये निर्दिष्ट केलेल्या मतदारगणांनी निवडून दिलेल्या व्यक्तींनी भरावयाच्या जागांच्या संख्या असतील ;

(ख) सहाव्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेली जागांची संख्या ही, राज्याच्या विधानसभेच्या सदस्यांनी त्या विधानसभेचे सदस्य नसलेल्या व्यक्तींमधून निवडून दिलेल्या व्यक्तींनी भरावयाच्या जागांची संख्या असेल ; आणि

(ग) सातव्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेली जागांची संख्या ही, त्या राज्याच्या राज्यपालाने [१]* * * अनुच्छेद १७१ च्या खंड (५) च्या उपबंधानुसार नामनियुक्त केलेल्या व्यक्तींनी भरावयाच्या जागांची संख्या असेल.

[२]* * * * *

विधानपरिषद मतदार संघांचे परिसीमन.

**११.** या अधिनियमाच्या प्रारंभानंतर शक्य होईल तितक्या लवकर, राष्ट्रपती, आदेशाद्वारे पुढील गोष्टी ठरवील :—

(क) जेथे जेथे विधानपरिषद आहे असे प्रत्येक राज्य, त्या परिषदेच्या निवडणुकीच्या प्रयोजनार्थ अनुच्छेद १७१ च्या खंड (३) मधील उपखंड (क), (ख) व (ग) खाली किती मतदारसंघात विभागले जाईल ते ;

(ख) प्रत्येक मतदारसंघाचा विस्तार ; आणि

(ग) प्रत्येक मतदारसंघाला वाटून दिलेल्या जागांची संख्या.

## मतदारसंघांचे परिसीमन करणाऱ्या आदेशाबाबत उपबंध

आदेशात फेरबदल किंवा विशोधन करण्याची शक्ती.

**१२.** [३][ (१) ] राष्ट्रपतीला [४]* * * कलम ११ खाली त्याने काढलेल्या कोणत्याही आदेशात, वेळोवेळी निवडणूक आयोगाचा विचार घेतल्यानंतर फेरबदल किंवा विशोधन करता येईल.

[३][ (२) पोटकलम (१) खालील आदेशात, आदेश काढला जाण्याच्या निकटपूर्वी कोणत्याही विधानपरिषद मतदारसंघांचे प्रतिनिधित्व करत असलेला कोणताही सदस्य, आदेशाद्वारे नव्याने परिसीमन केलेल्या किंवा फेरबदल केलेल्या कोणत्याही मतदारसंघाला नेमून देण्याविषयीचे आणि राष्ट्रपतीला जरूरीच्या वाटतील अशा अन्य आनुषंगिक व परिणामरूप बाबींविषयीचे उपबंध अंतर्भूत असू शकतील. ]

मतदारसंघांचे परिसीमन करणाऱ्या आदेशांबाबतची प्रक्रिया.

**१३.** [५]* * * * *

(३) [६]* * * कलम ११ किंवा कलम १२ खाली काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर संसदेसमोर ठेवला जाईल व ज्या दिनांकास तो आदेश याप्रमाणे ठेवण्यात आला त्या दिनांकापासून वीस दिवसांच्या आत आणलेल्या प्रस्तावावरून संसद करील असे बदल त्यात केले जाण्यास तो पात्र असेल.

---

१. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ द्वारे " किंवा, प्रकरणपरत्वे, राज्यप्रमुखाने " हे शब्द गाळले.

२. वरील आदेशाद्वारे समाविष्ट केलेले पोटकलम (३) १९५७ चा अधिनियम ३७, कलम १२ द्वारे गाळले.

३. १९६० चा अधिनियम २०, कलम २ द्वारे कलम १२ यास त्या कलमाचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक दिला आणि पोटकलम (२) दाखल केले.

४. १९५६ चा अधिनियम २, कलम ७ द्वारे " कलम ६, कलम ९ किंवा " हे शब्द व आकडे गाळले.

५. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे पोटकलमे (१) व (२) गाळली.

६. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे " कलम ६, कलम ९ " हे शब्द व आकडे गाळले.

[१] [ भाग दोन क

## अधिकारी

**मुख्य निर्वाचन अधिकारी.**

**१३क.** (१) प्रत्येक राज्याकरिता एकेक मुख्य निर्वाचन अधिकारी असेल व तो म्हणजे, निवडणूक आयोग त्या शासनाचा विचार घेऊन यासंबंधात पदनिर्देशित किंवा नामनियुक्त करील असा त्या शासनाचा अधिकारी असेल.

(२) निवडणूक आयोगाचे अधीक्षण, निदेशन आणि नियंत्रण यांच्या अधीनतेने, मुख्य निर्वाचन अधिकारी या अधिनियमाखाली त्या राज्यातील सर्व मतदार याद्या तयार करण्याच्या, त्या सुधारण्याच्या व दुरुस्त करण्याच्या कामावर देखरेख करील.

**[२] [ जिल्हा निवडणूक अधिकारी.]**

[२] [**१३कक.** (१) संघ राज्यक्षेत्राहून अन्य अशा राज्यातील प्रत्येक जिल्ह्याकरिता, त्या राज्याच्या शासनाचा विचार घेऊन निवडणूक आयोग एकेक जिल्हा निवडणूक अधिकारी पदनिर्देशित किंवा नामनियुक्त करील व तो म्हणजे शासनाचा एखादा अधिकारी असेल :

त्या पदाची कार्ये एक अधिकारी समाधानकारकपणे पार पाडू शकणार नाही अशी जर निवडणूक आ[illegible]ाली तर, निवडणूक आयोगाला एखाद्या जिल्ह्याकरिता असे एकाहून अधिक अधिकारी पदनिर्देशित कि[illegible] [illegible]नियुक्त करता येतील.

(२) जर पोटकलम (१) खाली एखाद्या जिल्ह्याकरिता एकाहून अधिक जिल्हा निवडणूक अधिकारी पदनिर्देशित किंवा नामनियुक्त करण्यात आले असतील तर, निवडणूक आयोगाने ज्या आदेशात जिल्हा निवडणूक अधिकारी पदनिर्देशित किंवा नामनियुक्त केले असतील त्या आदेशात असा प्रत्येक अधिकारी कोणत्या क्षेत्राबाबत अधिकारिता वापरील तेही आयोग विनिर्दिष्ट करील.

(३) मुख्य निर्वाचन अधिकाऱ्याचे अधीक्षण, निदेश व नियंत्रण यांच्या अधीनतेने, जिल्हा निवडणूक अधिकारी राज्यातील सर्व संसदीय, विधानसभा व विधानपरिषद मतदारसंघाच्या मतदार याद्या तयार करण्याच्या व सुधारण्याच्या संबंधातील आपल्या अधिकारितेखालील जिल्ह्यातील किंवा क्षेत्रातील सर्व कामांचे समन्वयन करील आणि त्यावर देखरेख ठेवील.

(४) जिल्हा निवडणूक अधिकारी निवडणूक आयोगाकडून किंवा मुख्य निर्वाचन अधिकाऱ्याकडून त्याच्याकडे सोपविण्यात येतील अशी इतर कार्येही पार पाडील. ]

**मतदार नोंदणी अधिकारी.**

**१३ख.** (१) [३] [ [४] [ जम्मू व काश्मीर राज्यातील किंवा जेथे विधानसभा नाही अशा संघ राज्यक्षेत्रातील प्रत्येक संसदीय मतदारसंघ ], प्रत्येक विधानसभा मतदारसंघ आणि प्रत्येक विधानपरिषद मतदारसंघ यांची ] मतदार-यादी एक मतदार नोंदणी अधिकारी तयार करील व तीत तो सुधारणा करील आणि तो अधिकारी म्हणजे ज्या राज्यात तो मतदारसंघ असेल त्याच्या शासनाचा विचार घेऊन निवडणूक आयोग या संबंधात पदनिर्देशित किंवा नामनियुक्त करील असा त्या शासनाचा किंवा स्थानिक प्राधिकरणाचा अधिकारी असेल.

(२) मतदार नोंदणी अधिकारी, विहित निर्बंधाच्या अधीनतेने, त्या मतदारसंघाची मतदारयादी तयार करण्यासाठी आणि ती सुधारण्यासाठी त्यास योग्य वाटतील अशा व्यक्तींची नेमणूक करील.

**सहायक मतदार नोंदणी अधिकारी.**

**१३ग.** (१) निवडणूक आयोग कोणत्याही मतदार नोंदणी अधिकाऱ्याला त्याची कामे पार पाडण्याच्या कामी सहाय्य करण्यासाठी एका किंवा अधिक व्यक्तींची सहायक मतदार नोंदणी अधिकारी म्हणून नियुक्ती करू शकेल.

(२) मतदार नोंदणी अधिकाऱ्याच्या नियंत्रणाच्या अधीनतेने, प्रत्येक सहायक मतदार नोंदणी अधिकारी मतदार नोंदणी अधिकाऱ्यांची सर्व अथवा त्यांपैकी कोणतीही कार्ये पार पाडण्यास सक्षम असेल.

**[५] [ मुख्य मतदान अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी इ. निवडणूक आयोगाकडे प्रतिनियुक्तीवर असल्याचे मानण्यात येणे.]**

[५] [ **१३गग.** या भागामध्ये निर्देशिलेले आणि सर्व मतदानासाठी मतदार याद्या तयार करणे, तीमध्ये सुधारणा करणे आणि दुरुस्त्या करणे आणि सर्व निवडणुका आयोजित करणे या संबंधात कामावर लावलेला कोणताही अधिकारी किंवा कर्मचारीवर्ग, ज्या कालावधीसाठी तो अशा कामावर लावला होता त्या कालावधीसाठी निवडणूक आयोगाकडे प्रतिनियुक्तीवर असल्याचे मानण्यात येईल आणि असे अधिकारी आणि कर्मचारी त्या कालावधीत निवडणूक आयोगाचे नियंत्रण, अधीक्षण आणि अनुशासन यांच्या अधीन असतील. ]

---

१. १९५६ चा अधिनियम २, कलम ९ द्वारे भाग दोन क आणि भाग दोन ख समाविष्ट केले.

२. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ५ द्वारे समाविष्ट केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून)

३. १९५६ चा अधिनियम १०३, कलम ६५ द्वारे काही शब्दांऐवजी दाखल केले.

४. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ६ द्वारे काही शब्दांऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

५. १९८९ चा अधिनियम १, कलम २ द्वारे समाविष्ट केले (१५ मार्च, १९८९ रोजी व तेव्हापासून).

## भाग दोन ख

### संसदीय मतदारसंघांसाठी मतदार याद्या

संसदीय मतदारसंघांसाठी मतदार याद्या.

[१][ **१३घ.** (१) जम्मू व काश्मीर राज्यातील आणि जेथे विधानसभा नाही अशा एखाद्या संघ राज्यक्षेत्रातील संसदीय मतदारसंघाहून अन्य अशा प्रत्येक संसदीय मतदारसंघाची मतदार यादी ही त्या संसदीय मतदारसंघातील सर्व विधानसभा मतदारसंघाच्या मतदार याद्या मिळून बनलेली असेल ; आणि अशा कोणत्याही संसदीय मतदारसंघाची यादी स्वतंत्रपणे तयार करण्याची किंवा सुधारण्याची जरूरी असणार नाही :

परंतु, अनुच्छेद ३७१क च्या खंड (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कालावधीकरिता, नागालँडच्या संसदीय मतदारसंघाचा जो भाग ट्यूएनसांग जिल्ह्याचा बनलेला आहे त्याची मतदार यादी स्वतंत्रपणे तयार करणे व सुधारणे जरूरीचे आहे.

(२) भाग तीनचे उपबंध हे जसे विधानसभा मतदारसंघाच्या संबंधात लागू होतात तसे ते जम्मू व काश्मीर राज्यातील किंवा जेथे विधानसभा नाही अशा एखाद्या संघ राज्यक्षेत्रातील प्रत्येक संसदीय मतदारसंघाच्या संबंधात लागू होतील. ] ]

## भाग तीन

### [२][ विधान सभा [३]* * मतदारसंघांसाठी मतदार याद्या ]

व्याख्या.

[४][ **१४.** या भागात संदर्भानुसार आवश्यक नसेल तर,---

(क) " मतदारसंघ " याचा अर्थ, विधानसभा मतदारसंघ, [३]* * * असा आहे ;

(ख) या भागाखाली प्रत्येक मतदार यादी तयार करण्याच्या किंवा सुधारण्याच्या कामाच्या संबंधात, " अर्हकारी दिनांक " याचा अर्थ, ज्या वर्षात ती मतदार यादी याप्रमाणे तयार करण्यात किंवा सुधारण्यात आली असेल त्या वर्षाचा [५][ १ जानेवारीचा दिवस ], असा आहे : ]

[६][ परंतु, १९८९ मध्ये या भागा अन्वये प्रत्येक मतदार यादी तयार करणे किंवा तीत सुधारणा करणे या संबंधात " अर्हता दिनांक " १ एप्रिल, १९८९ हा असेल. ]

प्रत्येक मतदारसंघाची मतदार यादी.

**१५.** प्रत्येक मतदारसंघाची एकेक मतदार यादी असेल व ती निवडणूक आयोगाचे अधीक्षण, निदेशन व नियंत्रण यांच्या अधीनतेने, या अधिनियमाच्या उपबंधानुसार तयार केली जाईल.

मतदार यादीत नोंदणी होण्याबाबत निरर्हता.

**१६.** (१) एखादी व्यक्ती जर—

(क) भारताचा नागरिक नसेल ; किंवा

(ख) विकल मनाची असून सक्षम न्यायालयाने तसे घोषित केलेले असेल किंवा ; किंवा

(ग) निवडणुकीच्या संबंधातील भ्रष्टाचाराची [७]* * * कृत्ये व अन्य गुन्हे यांसंबंधीच्या कोणत्याही कायद्याच्या उपबंधाखाली त्या त्या काळी मतदान करण्यास निरर्ह केली गेली असेल,

तर ती मतदार यादीत नोंदली जाण्यास निरर्ह होईल.

(२) जी व्यक्ती नोंदणीनंतर याप्रमाणे निरर्ह होईल अशा कोणत्याही व्यक्तीचे नाव, ज्या मतदार यादीत तिचे नाव समाविष्ट असेल त्या यादीतून तात्काळ काढून टाकले जाईल :

---

१. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ७ द्वारे कलम १३घ ऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

२. १९५६ चा अधिनियम २, कलम १० द्वारे " संसदीय मतदारांची नोंदणी " या शीर्षकांऐवजी दाखल केले.

३. १९५६ चा अधिनियम १०३, कलम ६५ द्वारे काही शब्द गाळले.

४. १९५६ चा अधिनियम २, कलम ११ द्वारे कलम १४ ऐवजी दाखल केले.

५. १९५८ चा अधिनियम ५८, कलम ५ द्वारे " १ मार्चचा दिवस " या मजकुराऐवजी दाखल केले (१ जानेवारी, १९५९ रोजी व तेव्हापासून).

६. १९८९ चा अधिनियम २१, कलम ३ द्वारे समाविष्ट केले (२८ मार्च, १९८९ रोजी व तेव्हापासून).

७. १९५० चा अधिनियम ७३, कलम ४ द्वारे समाविष्ट केलेले " आणि अवैध " हे शब्द १९६० चा अधिनियम ५८, कलम ३ व अनुसूची दोन यांद्वारे गाळले.

[१][ परंतु, जेव्हा पोटकलम (१), खंड (ग) खालील निरर्हतेमुळे एखाद्या मतदारसंघाच्या मतदारयादीतून एखाद्या व्यक्तीचे नाव काढून टाकलेले असेल तेव्हा, अशी मतदार यादी अंमलात असेल त्या काळात जर अशी निरर्हता दूर करण्याचे प्राधिकृत करणाऱ्या कोणत्याही कायद्याखाली ती निरर्हता दूर करण्यात आली तर, तात्काळ पुन्हा त्या यादीत तिचे नाव घातले जाईल. ]

**१७.** कोणतीही व्यक्ती [२]* * * एकापेक्षा अधिक मतदारसंघाच्या मतदार यादीत नोंदणी होण्यास हक्कदार असणार नाही. **कोणत्याही व्यक्तीची एकापेक्षा अधिक मतदारसंघांमध्ये नोंदणी करावयाची नाही.**

**१८.** कोणतीही व्यक्ती कोणत्याही मतदारसंघाच्या मतदार यादीत एकापेक्षा अधिक वेळा नोंदणी होण्यास हक्कदार असणार नाही. **कोणत्याही व्यक्तीची कोणत्याही मतदारसंघांमध्ये एकापेक्षा अधिक वेळा नोंदणी करावयाची नाही.**

**१९.** या भागाच्या पूर्वगामी उपबंधाच्या अधीनतेने, जी व्यक्ती— **[३][ नोंदणीच्या शर्ती.**

(क) अर्हकारी दिनांकास [४][ अठरा वर्षांपेक्षा ] कमी वयाची नसेल, आणि

(ख) एखाद्या मतदारसंघाची सर्वसामान्यपणे रहिवासी असेल,

अशी प्रत्येक व्यक्ती त्या मतदारसंघाच्या मतदार यादीमध्ये नोंदली जाण्यास हक्कदार असेल. ]

**२०.** [५][ (१) एखाद्या मतदारसंघातील एखादे राहते घर एखाद्या व्यक्तीच्या मालकीचे आहे किंवा तिच्या कब्जात आहे एवढ्याच कारणाने ती व्यक्ती तेथील सर्वसामान्यपणे रहिवासी असल्याचे मानले जाणार नाही. **" सर्वसामान्यपणे रहिवासी " याचा अर्थ.**

(१क) एखादी व्यक्ती सर्वसामान्यपणे जेथे राहते त्या जागेत ती तात्पुरती अनुपस्थित असल्यास त्या कारणाने ती तेथील सर्वसामान्यपणे रहिवासी असण्याचे बंद होत नाही.

(१ख) संसदेचा किंवा राज्याच्या विधानसभेचा सदस्य, त्याच्या निवडणुकीच्या वेळी ज्या मतदारसंघाच्या मतदार यादीत मतदार म्हणून त्याची नोंदणी झालेली असेल तेथे असा सदस्य या नात्याने त्याच्या कामाच्या निमित्ताने अनुपस्थित राहिल्यामुळे तो त्या मतदारसंघाचा सर्वसामान्यपणे रहिवासी असण्याचे त्याच्या पदावधीच्या काळात बंद होत नाही. ]

(२) एखादी व्यक्ती, संपूर्णपणे किंवा मुख्यत्वेकरून मानसिक आजाराने किंवा मानसिक वैगुण्याने पीडित असलेल्या व्यक्तींना दाखल करून घेऊन त्यांच्यावर उपचार करण्याकरिता चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही संस्थेतील रुग्ण असेल अथवा तिला कारागृहात किंवा कोणत्याही वेळी अन्य वैध हवालतीत स्थानबद्ध केलेले असेल तर केवळ त्या कारणाने ती तेथील सर्वसामान्यपणे रहिवाशी असल्याचे मानले जाणार नाही.

[६][ (३) सेवाप्राप्त अर्हता असलेली कोणतीही व्यक्ती एखाद्या दिनांकास, तिच्याकडे अशी सेवाप्राप्त अर्हता नसती तर त्या दिनांकास ज्या मतदारसंघाची सर्वसामान्यपणे रहिवाशी असल्याचे ठरली असती त्याच मतदारसंघाची ती सर्वसामान्यपणे रहिवासी असल्याचे मानले जाईल. ]

---

१. १९५० चा अधिनियम ७३, कलम ४ द्वारे समाविष्ट केले.

२. १९५६ चा अधिनियम २, कलम १२ द्वारे समाविष्ट केलेले " त्याच राज्यात " हे शब्द १९५८ चा अधिनियम ५८, कलम ६ द्वारे गाळले.

३. १९५८ चा अधिनियम ५८, कलम ७ द्वारे कलम १९ ऐवजी दाखल केले.

४. १९८९ चा अधिनियम २१, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२८ मार्च, १९८९ रोजी व तेव्हापासून).

५. १९५८ चा अधिनियम ५८, कलम ८ द्वारे पोटकलम (१) ऐवजी दाखल केले.

६. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ८ द्वारे पोटकलम (३) ऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

(४) राष्ट्रपतींनी निवडणूक आयोगाचा विचार घेऊन या पोटकलमाचे उपबंध ज्यास लागू आहेत असे घोषित[१] केले असेल असे कोणतेही अधिकार पद भारतात धारण करणारी कोणतीही व्यक्ती [२]* * * * [३]* * * * एखाद्या दिनांकास ती कोणतेही अधिकारपद [४]* * * * धारण करत नसती तर ज्या मतदारसंघाची सर्वसामान्यपणे रहिवासी ठरली असती त्याच मतदारसंघाची ती [५]* * * * त्या दिनांकास सर्वसामान्यपणे रहिवासी असल्याचे मानले जाईल.

(५) पोटकलम (३) किंवा पोटकलम (४) मध्ये निर्देशिलेल्या अशा कोणत्याही व्यक्तीने, [६][ स्वतःला सेवाप्राप्त अर्हता नसती तर, ] अथवा पोटकलम (४) मध्ये निर्देशिल्याप्रमाणे आपण असे कोणतेही अधिकार-पद धारण करत नसतो तर [७]* * * आपण [३]* * * एखाद्या दिनांकास विनिर्दिष्ट ठिकाणचे सर्वसामान्यपणे रहिवासी ठरलो असतो असे विहित नमुन्यात दिलेले व विहित रीतीने सत्यापित केलेले निवेदन, विरुद्ध पुराव्याच्या अभावी [६][ बरोबर म्हणून ग्राह्य धरले जाईल. ]

(६) पोटकलम (३) किंवा पोटकलम (४) मध्ये निर्देशिलेल्या अशा कोणत्याही व्यक्तीची पत्नी जर ती [८]* * * अशा व्यक्तीबरोबर सर्वसामान्यपणे राहत असेल तर, अशा व्यक्तीने पोटकलम (५) खाली विनिर्दिष्ट केलेल्या मतदारसंघांची ती [९]* * * सर्वसामान्यपणे रहिवासी असल्याचे मानले जाईल.

[१०][ (७) एखादी व्यक्ती कोणत्या ठिकाणची सर्वसामान्यपणे रहिवासी आहे असा प्रश्न जर एखाद्या प्रकरणी उद्‌भवला तर, त्या प्रकरणाची सर्व तथ्ये आणि निवडणूक आयोगाचा विचार घेऊन केंद्र शासन याबाबत करील असे नियम लक्षात घेऊन त्या प्रश्नाचा निर्णय केला जाईल.

(८) पोटकलमे (३) व (५) यांमध्ये "सेवाप्राप्त अर्हता" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :—

(क) संघाच्या सशस्त्र सेनेचा सदस्य असणे ; किंवा

(ख) ज्या सेनेला 'भूसेना अधिनियम, १९५०' (१९५० चा ४६) याचे उपबंध, त्यात बदल करून किंवा त्याशिवाय लागू केलेले आहेत त्या सेनेचा सदस्य असणे ; किंवा

(ग) एखाद्या राज्याच्या सशस्त्र पोलीस दलाचा त्या राज्याबाहेर सेवेत असणारा असा सदस्य असणे ; किंवा

(घ) भारत सरकारच्या नोकरीत असून भारताबाहेर एखाद्या पदावर काम करणारी अशी व्यक्ती असणे. ]

---

१. राष्ट्रपतींनी अधिसूचना क्रमांक एसओ/९५९, दिनांक १८ एप्रिल, १९६० याद्वारे पुढील अधिकारपदे जाहीर केली आहेत :—

(१) भारताचा राष्ट्रपती.
(२) भारताचा उपराष्ट्रपती.
(३) राज्यांचे राज्यपाल.
(४) संघराज्यांचे किंवा कोणत्याही राज्यांचे कॅबिनेट मंत्री.
(५) नियोजन आयोगाचा उपाध्यक्ष आणि त्याचे सदस्य.
(६) संघराज्यांचे किंवा कोणत्याही राज्यांचे राज्य मंत्री.
(७) संघराज्यांचे किंवा कोणत्याही राज्यांचे उप मंत्री.
(८) लोकसभेचा किंवा कोणत्याही राज्य विधानसभेचा अध्यक्ष.
(९) कोणत्याही राज्य विधानपरिषदेचा सभापती.
(१०) संघ राज्यक्षेत्रांचे नायब राज्यपाल.
(११) लोकसभेचा किंवा कोणत्याही राज्य विधानसभेचा उपाध्यक्ष.
(१२) राज्यसभेचा किंवा कोणत्याही राज्य विधानपरिषदेचा उप सभापती.
(१३) संघराज्याचे किंवा कोणत्याही राज्यांचे सचिव.

२. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ८ द्वारे "किंवा भारताबाहेर भारत सरकारच्या सेवेत एखाद्या पदावर नेमणूक झालेली कोणतीही व्यक्ती" हे शब्द गाळले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

३. १९५६ चा अधिनियम २, कलम १४ द्वारे "एखाद्या कालावधीत किंवा" हे शब्द गाळले.

४. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ८ द्वारे "किंवा नेमणूक" हे शब्द गाळले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

५. १९५६ चा अधिनियम २, कलम १४ द्वारे "त्या कालावधीत किंवा" हे शब्द गाळले.

६. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ८ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी दाखल केले. (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

७. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे "किंवा अशा कोणत्याही पदावर आपली नेमणूक झाली नसती तर" हे शब्द गाळले.

८. १९५६ चा अधिनियम २, कलम १४ द्वारे "एखाद्या कालावधीत" हे शब्द गाळले.

९. वरील अधिनियमाच्या कलम १४ द्वारे "त्या कालावधीत" हे शब्द गाळले.

१०. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ८ द्वारे समाविष्ट केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून). मूळ पोटकलम (७), १९५६ चा अधिनियम २, कलम १४ द्वारे निरसित केले होते.

[1][ **२१.** (१) प्रत्येक मतदारसंघाची मतदार यादी अर्हकारी दिनांकाला अनुलक्षून विहित रीतीने तयार केली जाईल, व या अधिनियमाखाली केलेल्या नियमांनुसार तिचे अंतिम प्रकाशन होताच ती तात्काळ अंमलात येईल. **मतदार याद्या तयार करणे व सुधारणे.**

[2][ (२) (क) कारणे लेखी नमूद करून निवडणूक आयोगाने अन्यथा निर्देशित केले नसेल तर उक्त मतदार यादी---

(१) लोकसभेच्या किंवा एखाद्या राज्यातील विधानसभेच्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी ; आणि

(२) त्या मतदारसंघाच्या वाट्याला आलेली एखादी जागा निमित्तवशात् रिकामी झाली असता ती भरण्यासाठी होणाऱ्या प्रत्येक पोटनिवडणुकीपूर्वी,

अर्हकारी दिनांकाला अनुलक्षून विहित रीतीने सुधारली जाईल ; आणि

(ख) उक्त मतदार यादी एखाद्या वर्षी अर्हकारी दिनांकाला अनुलक्षून विहित रीतीने सुधारावी असा निवडणूक आयोगाने निदेश दिला तर, तीत त्याप्रमाणे सुधारणा केली जाईल :

परंतु, जर पूर्वोक्तानुसार मतदार यादी सुधारली गेली नाही तर, त्यामुळे उक्त मतदार यादीच्या विधिग्राह्यतेवर किंवा तिचे प्रवर्तन चालू राहाण्यावर परिणाम होणार नाही. ]

(३) पोटकलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, निवडणूक आयोग कोणत्याही वेळी कारणे नमूद करून कोणत्याही मतदारसंघाच्या किंवा मतदारसंघातील कोणत्याही भागाच्या मतदार यादीची आपणास योग्य वाटेल अशा रीतीने विशेष सुधारणा करण्याचे निदेशित करू शकेल :

परंतु, या अधिनियमाच्या अन्य उपबंधाच्या अधीनतेने, त्या मतदारसंघाची मतदार यादी असा कोणताही निदेश दिला जाण्याच्या वेळी जशी अंमलात होती ती याप्रमाणे निदेशित केलेली विशेष सुधारणा पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

**२२.** जर कोणत्याही मतदारसंघाच्या मतदार नोंदणी अधिकाऱ्याने त्याच्याकडे अर्ज आल्यावर किंवा स्वतः होऊन, आपणास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर,--- [3][ **मतदार यादीतील नोंदीची दुरुस्ती.**

(क) मतदारसंघाच्या मतदार यादीतील एखादी नोंद एखाद्या तपशिलापुरती चुकीची किंवा सदोष आहे ;

(ख) संबंधित व्यक्ती त्या मतदारसंघात सर्वसामान्यपणे जेथे राहते ती जागा तिने बदलली आहे या कारणावरून ती नोंद त्या यादीत दुसऱ्या जागी घातली पाहिजे, किंवा

(ग) संबंधित व्यक्ती मृत्यू पावली आहे किंवा ती त्या मतदारसंघाची सर्वसामान्यपणे रहिवासी असण्याचे बंद झाले आहे किंवा त्या यादीत नोंदली जाण्यास ती व्यक्ती अन्यथा हक्कदार नाही या कारणावरून ती नोंद गाळली पाहिजे,

अशी त्याची खात्री झाली तर, तो मतदार नोंदणी अधिकारी निवडणूक आयोगाने या संबंधात कोणतेही सर्वसाधारण किंवा विशेष निदेश दिल्यास त्यांच्या अधीनतेने ती नोंद विशोधित करील, दुसऱ्या जागी घालील किंवा गाळून टाकील :

परंतु, खंड (क) किंवा खंड (ख) खालील कोणत्याही कारणावरून कोणतीही कारवाई करण्यापूर्वी अथवा संबंधित व्यक्ती त्या मतदारसंघाची सर्वसामान्यपणे रहिवासी असण्याचे बंद झाले आहे किंवा त्या मतदारसंघाच्या मतदार यादीत नोंदली जाण्यास ती अन्यथा हक्कदार नाही या कारणावरून खंड (ग) खाली कोणतीही कारवाई करण्यापूर्वी, मतदार नोंदणी अधिकारी संबंधित व्यक्तीला, तिच्या संबंधात जी कारवाई करण्याचे योजले असेल तिच्याबाबत आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल. ]

**२३.** (१) एखाद्या मतदारसंघाच्या मतदार यादीत जिचे नाव समाविष्ट केलेले नसेल अशा कोणत्याही व्यक्तीला त्या यादीत आपल्या नावाचा समावेश करवून घेण्यासाठी यात यापुढे उपबंधित केलेल्या रीतीने मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल. [4][ **मतदार यादीत नावांचा समावेश करणे.**

(२) अर्जदार त्या मतदार यादीत नोंदणी करण्यास हक्कदार आहे अशी जर मतदार नोंदणी अधिकाऱ्याची खात्री झाली तर, तो त्याचे नाव त्या यादीत समाविष्ट करण्याचा निदेश देईल :

परंतु, जर अन्य कोणत्याही मतदारसंघाच्या मतदार यादीत अर्जदाराची नोंदणी झालेली असेल तर, तो मतदार नोंदणी अधिकारी त्या दुसऱ्या मतदारसंघाच्या मतदार नोंदणी अधिकाऱ्यास तसे कळवील व तो अधिकारी ती माहिती मिळाल्यानंतर त्या मतदार यादीतून अर्जदाराचे नाव काढून टाकील.

---

१. १९५६ चा अधिनियम २, कलम १५ द्वारे कलमे २१ ते २५ यांऐवजी दाखल केली.

२. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ९ द्वारे पोटकलम (२) ऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

३. १९५८ चा अधिनियम ५८, कलम ९ द्वारे कलम २२ ऐवजी दाखल केले.

४. १९६६ चा अधिनियम ४७, कलम १० द्वारे कलम २३ ऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

(३) एखाद्या मतदारसंघातील अथवा ज्या संसदीय मतदारसंघात तो मतदारसंघ समाविष्ट असेल त्यातील निवडणुकीसाठी नामनिर्देशने करण्यासाठी नेमलेल्या शेवटच्या दिनांकानंतर आणि ती निवडणूक पूर्ण होण्यापूर्वी कलम २२ खाली त्या मतदारसंघाच्या मतदार यादीतील कोणतीही नोंद विशोधित केली जाणार नाही, दुसऱ्या जागी घातली जाणार नाही किंवा गाळली जाणार नाही, आणि तीत एखादे नाव समाविष्ट करण्याचा निदेश दिला जाणार नाही. ]

अपिले. [१][ २४. (क्) कलम २२ किंवा २३ खाली मतदार नोंदणी अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशावर मुख्य निर्वाचन अधिकाऱ्याकडे * * *

* * * * *

विहित करण्यात येईल अशा मुदतीत व अशा रीतीने अपील होऊ शकेल. ]

अर्ज व अपिले यांसाठी फी. २५. कलम २२ किंवा कलम २३ खालील प्रत्येक अर्जासोबत व कलम २४ खालील प्रत्येक अपिलासोबत विहित फी भरावी लागेल व ती कोणत्याही परिस्थितीत परत केली जाणार नाही. ]

[३][ सिक्कीममधील संघ मतदारसंघात मतदार म्हणून नोंदणी करण्याबाबतच्या शर्ती. २५क. कलमे १५ व १९ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी सिक्कीम राज्यातील संघ मतदारसंघाच्या बाबतीत, सिक्कीम विधानसभा निर्माण करण्याकरता एप्रिल १९७४ मध्ये सिक्कीममध्ये घेण्यात आलेल्या निवडणुकांच्या प्रयोजनार्थ मान्यताप्राप्त असणाऱ्या, मठांच्या संघानाच फक्त मतदार यादीत नोंदले जाण्याचा हक्क असेल, आणि उक्त मतदारयादी ही, कलमे २१ ते २५ यांच्या उपबंधांच्या अधीनतेने, सिक्कीम शासनाशी विचारविनिमय करून निवडणूक आयोग निदेशित करील त्याप्रमाणे तयार करण्यांत किंवा सुधारण्यात येईल. ]

## भाग चार

## [४][ विधानपरिषद मतदारसंघासाठी मतदार याद्या ]

२६. [ विधानसभा मतदारसंघासाठी मतदार याद्या तयार करणे. ] ' लोकप्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९५६ ' (१९५६ चा २) कलम १७ द्वारे निरसित.

विधानपरिषद मतदारसंघांसाठी मतदार याद्या तयार करणे. २७. (१) या कलमामध्ये " स्थानिक प्राधिकरण मतदारसंघ ", " पदवीधर मतदारसंघ ", आणि " शिक्षक मतदारसंघ " यांचा अर्थ, अनुच्छेद १७१ च्या खंड (३) मधील अनुक्रमे उपखंड (क्), उपखंड (ख्) व उपखंड (ग्) यांखाली होणाऱ्या विधानपरिषदेच्या निवडणुकींसाठी योजलेला मतदारसंघ, असा आहे.

[५][ (२) कोणत्याही स्थानिक प्राधिकरण मतदारसंघातून होणाऱ्या राज्याच्या विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या प्रयोजनार्थ,---

(क्) मतदारगण हा चौथ्या अनुसूचीत त्या राज्याच्या संबंधात विनिर्दिष्ट केली आहेत अशी जी स्थानिक प्राधिकरणे, त्या मतदार संघाच्या सीमांमधील कोणत्याही स्थळी किंवा क्षेत्रात अधिकारिता वापरतात त्यांचे सदस्य मिळून बनलेला असेल ;

(ख्) स्थानिक प्राधिकरण मतदारसंघातील अशा प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाचा प्रत्येक सदस्य त्या मतदारसंघाच्या मतदार यादीत नोंदला जाण्यास हक्कदार असेल ;

(ग्) प्रत्येक स्थानिक प्राधिकरण मतदारसंघाचा मतदार नोंदणी अधिकारी आपल्या कार्यालयात विहित रीतीने व विहित नमुन्यानुसार या मतदारसंघाची दुरूस्त केलेली अद्ययावत मतदार यादी ठेवील ;

१. १९६१ चा अधिनियम ४०, कलम ३ द्वारे समाविष्ट केले (२० सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून). १९५६ चा अधिनियम ६०, कलम २ द्वारे घातलेले पूर्वीचे कलम २४ हे, १९५८ चा अधिनियम ५८, कलम १० द्वारे गाळले होते.

२. १९६६ चा अधिनियम ४७, कलम ११ द्वारे " आणि " हा शब्द व खंड (ख्) गाळले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).

३. १९७६ चा अधिनियम १०, कलम २ व अनुसूची यांद्वारे समाविष्ट केले (९ सप्टेंबर, १९७५ रोजी व तेव्हापासून).

४. १९५६ चा अधिनियम २, कलम १६ द्वारे पूर्वीच्या शीर्षकाऐवजी दाखल केले.

५. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे मूळ पोटकलम (२) ऐवजी दाखल केले.

(घ) मतदार नोंदणी अधिकाऱ्याला दुरुस्त केलेली अद्ययावत मतदार यादी ठेवता यावी यासाठी प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी (मग तो कोणत्याही पदनामाने ओळखला जात असो) मतदार नोंदणी अधिकाऱ्याला त्या स्थानिक प्राधिकरणाच्या सदस्यगणात झालेल्या प्रत्येक बदलाचे वृत्त तात्काळ कळवील आणि ते वृत्त मिळाल्यानंतर मतदार नोंदणी अधिकारी ज्या व्यक्ती त्या स्थानिक प्राधिकरणाच्या सदस्य राहिलेल्या नसतील त्यांची नावे मतदार यादीतून काढून टाकील व ज्या व्यक्ती त्या स्थानिक प्राधिकरणाच्या सदस्य झालेल्या असतील त्यांची नावे तीत समाविष्ट करील ; आणि

(ङ) कलमे १५, १६, १८, २२ व २३ यांचे उपबंध जसे विधानसभा मतदारसंघाच्या संबंधात लागू आहेत तसे ते स्थानिक प्राधिकरण मतदारसंघाच्या संबंधात लागू असतील. ]

(३) पदवीधर मतदारसंघातून आणि शिक्षक मतदारसंघातून होणाऱ्या, राज्याच्या विधानपरिषदेच्या निवडणुकींच्या प्रयोजनासाठी, संबंधित राज्य शासनाला निवडणूक आयोगाच्या सहमतीने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे—

(क) कोणत्या अर्हता भारताच्या राज्यक्षेत्रातील विद्यापीठांच्या पदवीधराच्या बरोबरीच्या मानल्या जातील, आणि

(ख) माध्यमिक शाळेपेक्षा दर्जाने कनिष्ठ नसलेल्या अशा, राज्यातील शिक्षणसंस्था कोणत्या हे विनिर्दिष्ट करता येईल.

[१][ (४) कलमे १५, १६, १८, २१, २२ व २३ यांचे उपबंध जसे विधानसभा मतदारसंघांच्या संबंधात लागू आहेत तसे ते पदवीधर मतदारसंघाच्या व शिक्षक मतदारसंघाच्या संबंधात लागू असतील. ]

(५) या कलमाच्या पूर्वगामी उपबंधाच्या अधीनतेने,—

[२]* * * * * *

[२][ (क) ] जी व्यक्ती एखाद्या पदवीधर मतदारसंघाची [३][ सर्वसामान्यपणे रहिवासी आहे ] आणि [४][ अर्हकारी दिनांकापूर्वी ] निदान तीन वर्षे भारताच्या राज्यक्षेत्रातील एखाद्या विद्यापीठाची पदवीधर आहे किंवा पोटकलम (३) च्या खंड (क) खाली राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणतीही अर्हता धारण करत आहे अशी प्रत्येक व्यक्ती त्या मतदारसंघाच्या मतदार यादीत नोंदली जाण्यास हक्कदार असेल, आणि

[५][ (ख) ] जी व्यक्ती शिक्षक मतदारसंघाची [३][ सर्वसामान्यपणे रहिवासी आहे ] आणि [४][ अर्हकारी दिनांकाच्या ] निकटपूर्वीच्या सहा वर्षांपैकी एकूण निदान तीन वर्षे इतका काळ पोटकलम (३) च्या खंड (ख) खाली संबंधित राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही शिक्षणसंस्थेत अध्यापनाच्या व्यवसायात आहे, अशी प्रत्येक व्यक्ती त्या मतदारसंघाच्या मतदार यादीत नोंदली जाण्यास हक्कदार असेल.

[६][ (६) पोटकलमे (४) आणि (५) यांच्या प्रयोजनार्थ, अर्हकारी दिनांक म्हणजे ज्या वर्षी मतदार यादी तयार करण्याचे किंवा सुधारण्याचे काम सुरू होईल त्या वर्षीच्या नोव्हेंबरचा पहिला दिवस असेल. ]

---

१. १९५६ चा अधिनियम २, कलम १८ द्वारे पोटकलम (४) ऐवजी दाखल केले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे खंड (क) गाळला आणि खंड (ख) यास खंड (क) असे नाव दिले.

३. १९६१ चा अधिनियम ४०, कलम ४ द्वारे " अर्हता दिनांकास सर्वसामान्यपणे राहणारी होती " या शब्दाऐवजी दाखल केले (२० सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे " त्या दिनांकापूर्वी " या शब्दाऐवजी दाखल केले (२० सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून).

५. १९५६ चा अधिनियम २, कलम १८ द्वारे खंड (ग) ला खंड (ख) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

६. १९६१ चा अधिनियम ४०, कलम ४ द्वारे पोटकलम (६) ऐवजी दाखल केले (२० सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून).

[१][ भाग चार क ]

## राज्यसभेतील ज्या जागा [२][ संघ राज्यक्षेत्रांच्या ] प्रतिनिधींनी भरावयाच्या त्या जागा भरण्याची रीत

राज्यसभेत संघ राज्यक्षेत्रांना वाटून दिलेल्या जागा भरण्यासाठी निर्वाचकगण बनवणे.

**२७क.** (१) संविधानाच्या चौथ्या अनुसूचीत एखाद्या [२][ संघ राज्यक्षेत्राला ] [३]* * * वाटून दिलेली राज्यसभेतील [४][ कोणतीही जागा किंवा कोणत्याही जागा भरण्यासाठी ] [२][ अशा प्रत्येक राज्य क्षेत्रासाठी ]. [५]* * * * * एकेक निर्वाचकगण असेल.

[५]* * * * *

[६]* * * * *

[७][ (३) दिल्ली या संघराज्य क्षेत्राचा निर्वाचकगण, दिल्ली राष्ट्रीय राजधानी राज्यक्षेत्र शासन अधिनियम, १९९१ याखाली त्या राज्यक्षेत्रासाठी घटित करण्यात आलेल्या विधानसभेवर निवडून आलेल्या सदस्यांनी बनलेला असेल.

[८][ (४) [९][ [१०]* * * * पाँडेचरी संघ राज्यक्षेत्राचा निर्वाचकगण ] ' संघ राज्यक्षेत्र शासन अधिनियम, १९६३ ' (१९६३ चा २०) या खाली त्या संव राज्यक्षेत्रासाठी घटित करण्यात आलेल्या विधानसभेवर निवडून आलेले सदस्य मिळून बनलेला असेल. ]

[११]* * * * *

[१२]* * * * *

**२७ख.** [ निर्वाचकगण मतदारसंघ. ] ' क्षेत्रीय परिषदा अधिनियम, १९५६ ' (१९५६ चा १०३), कलम ६५ द्वारे निरसित.

**२७ग.** [ निर्वाचकगण मतदारसंघाचे परिसीमन. ] ' क्षेत्रीय परिषदा अधिनियम, १९५६ ' (१९५६ चा १०३), कलम ६५ द्वारे निरसित.

**२७घ.** [ आदेशात फेरबदल किंवा विशोधन करण्याची शक्ती. ] ' क्षेत्रीय परिषदा अधिनियम, १९५६ ' (१९५६ चा १०३), कलम ६५ द्वारे निरसित.

**२७ङ.** [ मतदारसंघांचे परिसीमन करणाऱ्या आदेशाबाबत प्रक्रिया. ] ' लोकप्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९५६ ' (१९५६ चा २), कलम २१ द्वारे निरसित.

**२७च.** [ राज्यसभा मतदारसंघाच्या मतदार याद्या. ] ' लोकप्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९५६ ' (१९५६ चा २), कलम ६५ द्वारे निरसित.

---

१. १९५० चा अधिनियम ७३, कलम ८ द्वारे भाग चार क समाविष्ट केला.
२. विधि अनुकूलन (क्र. २) आदेश, १९५६ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.
३. विधि अनुकूलन (क्र. २) आदेश, १९५६ द्वारे " किंवा अशा राज्यांच्या गटाला " हा मजकूर गाळला.
४. १९७५ चा अधिनियम २९, कलम ११ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१५ ऑगस्ट, १९७५ रोजी व तेव्हापासून).
५. १९५६ चा अधिनियम २, कलम १९ द्वारे " किंवा अशा राज्याच्या गटासाठी " हा मजकूर आणि परंतुक गाळले.
६. १९६३ चा अधिनियम २०, कलम ५७ व अनुसूची दोन यांद्वारे पोटकलम (२) गाळले.
७. १९९२ चा अधिनियम १, कलम ५५ द्वारे पोटकलम (३) ऐवजी दाखल केले.
८. १९६३ चा अधिनियम २०, कलम ५७ व अनुसूची दोन यांद्वारे पोटकलम (४) ऐवजी दाखल केले.
९. १९८६ चा अधिनियम ६९, कलम ७ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (२० फेब्रुवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).
१०. १९८६ चा अधिनियम ३४, कलम ७ द्वारे " मिझोराम " हा शब्द वगळण्यात आला (२० फेब्रुवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).
११. १९७५ चा अधिनियम ३२, कलम ११ द्वारे पोटकलम (५) गाळले (१५ ऑगस्ट, १९७५ रोजी व तेव्हापासून).
१२. १९५४ चा अधिनियम ३२, कलम ७ द्वारे पोटकलम (६) गाळले.

**२७छ.** जी व्यक्ती निर्वाचकगणाची सदस्य आहे ती जर भ्रष्टाचाराची व अवैध कृत्ये आणि संसदीय निवडणुकींच्या संबंधातील अन्य गुन्हे यासंबंधीच्या कोणत्याही कायद्याच्या उपबंधाखाली संसदेच्या सदस्यत्वास कोणत्याही प्रकारे निरर्ह झाली तर, तद्नंतर निर्वाचकगणाचे तिचे असे सदस्यत्व संपुष्टात येईल. **विवक्षित निरर्हतांमुळे निर्वाचकगणाच्या सदस्यत्वाची समाप्ती.**

**२७ज.** [१]* * * संविधानाच्या चौथ्या अनुसूचीत एखाद्या [२][ संघ राज्यक्षेत्राला ] [३]* * * वाटून दिलेली राज्यसभेतील जागा किंवा अनेक जागा [४][त्या राज्यक्षेत्राच्या ] [४]* * [५]* * निर्वाचक, गणाच्या सदस्यांनी एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीनुसार निवडून दिलेल्या व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या द्वारे भरली जाईल किंवा भरल्या जातील : **राज्यसभेत संघ राज्यक्षेत्राला वाटून दिलेल्या जागा भरण्याची रीत.**

[६][परंतु, ' संविधान (सातवे विशोधन) अधिनियम, १९५६ ' च्या प्रारंभाच्या निकटपूर्वी ज्या व्यक्तीने मणिपूर आणि त्रिपुरा या भाग ' ग ' राज्यांच्या वाट्याला नेमून देण्यात आलेली जागा भरली असेल ती व्यक्ती, अशा प्रारंभी व तेव्हापासून त्रिपुरा या संघ राज्यक्षेत्राच्या वाट्याला नेमून दिलेली जागा भरण्यासाठी रीतसर निवडून आली असल्याचे मानले जाईल. ]

**२७झ.** [ अजमेर व कुर्म या राज्यांच्या आणि मणिपूर व त्रिपुरा या राज्यांच्या वाट्याला नेमून दिलेल्या, राज्यसभेतील जागा भरण्यासाठी विशेष उपबंध. ] ' विधि अनुकूलन (क्र.२) आदेश, १९५६ ' द्वारे निरसित.

**२७ञ.** या अधिनियमाखाली निर्वाचकगणाच्या सदस्यांनी [७]* * * केलेल्या कोणत्याही निवडणुकीस केवळ अशा गणाच्या [८]* * * सदस्यांमध्ये कोणतीही जागा रिकामी असल्याच्या कारणावरून हरकत घेतली जाणार नाही. **निर्वाचकगणांमधील जागा रिकाम्या असल्या तरी निवडून देण्याची त्यांची शक्ती.**

**२७ट.** [ ज्यांच्यासाठी विधानसभा घटित करण्यात आल्या आहेत अशा विवक्षित राज्यांसाठी निर्वाचकगण. ] ' विधि अनुकूलन (क्र. २) आदेश, १९५६ ' द्वारे निरसित.

## भाग पाच

### सर्वसाधारण

**२८.** (१) निवडणूक आयोगाचा विचार घेतल्यानंतर, केंद्र शासनाला या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे [९]नियम करता येतील. **नियम करण्याची शक्ती.**

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींविषयी उपबंध करता येतील, ते असे :---

[१०][ (क) कलम २०, पोटकलम (७) खाली सर्वसामान्यपणे रहिवासी असण्याबाबतच्या प्रश्नाचा निर्णय करणे ;

(कक) मतदार याद्यांत नोंद करावयाचा तपशील ; ]

(ख) [११]* * * मतदार याद्यांचे प्रारंभिक प्रकाशन ;

---

१. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ द्वारे " कलम २७झ मध्ये अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीज करून " हा मजकूर गाळला.
२. वरील आदेशाद्वारे " भाग ' ग ' राज्याला " याऐवजी दाखल केले.
३. वरील आदेशाद्वारे " किंवा अशा राज्याच्या गटाला " हा मजकूर गाळला.
४. वरील आदेशाद्वारे " अशा राज्याच्या " याऐवजी दाखल केले.
५. १९५६ चा अधिनियम २, कलम २३ द्वारे " किंवा अशा राज्यांच्या गटाच्या " हा मजकूर गाळला.
६. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ द्वारे समाविष्ट केले.
७. १९५१ चा अधिनियम ४९, कलम ४४ व पाचवी अनुसूची यांद्वारे " किंवा कूर्ग विधानपरिषदेच्या निर्वाचित सदस्यांनी " हा मजकूर गाळला.
८. वरील अधिनियमाच्या कलम ४४ व पाचवी अनुसूची यांद्वारे " किंवा प्रकरणपरत्वे, परिषदेच्या " हा मजकूर गाळला.
९. मतदार नोंदणी नियम, १९६० पहा.
१०. १९६६ चा अधिनियम ४७, कलम १२ द्वारे खंड (क) ऐवजी दाखल केले (१४ डिसेंबर, १९६६ रोजी व तेव्हापासून).
११. १९५० चा अधिनियम ७३, कलम ९ द्वारे " त्या ज्यांच्याशी संबंधित असतील त्या मतदार संघामध्ये " हा मजकूर गाळला.

(ग्) मतदार याद्यांमधील नोंदीबाबत कशा रीतीने व किती अवधीत हक्कमागण्या आणि हरकती सादर करता येतील ;

[१]* * * * *

(ङ्) कशा रीतीने हक्कमागण्यांच्या आणि हरकतींच्या नोटिसा प्रकाशित करण्यात येतील ;

(च्) कोणत्या स्थळी, कोणत्या दिनांकास व कोणत्या वेळी हक्कमागण्या किंवा हरकती ऐकून घेतल्या जातील आणि कशा रीतीने हक्कमागण्या किंवा हरकती ऐकून घेतल्या जातील आणि त्यांचा निकाल केला जाईल ;

(छ्) मतदार याद्यांचे अंतिम प्रकाशन ;

[२][ (ज्) मतदार याद्यांत सुधारणा व दुरुस्त्या करणे आणि त्यात नावे समाविष्ट करणे ; ]

(झ्) जी गोष्ट विहित करणे या अधिनियमाने आवश्यक केलेले आहे अशी अन्य कोणतीही बाब.

[३][ (३) या अधिनियमान्वये केंद्र शासनाने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्राच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही. ]

[४][ स्थानिक प्राधिकरणांचा कर्मचारीवर्ग उपलब्ध करून देणे.

**२९.** राज्यातील प्रत्येक स्थानिक प्राधिकरण, राज्याच्या मुख्य निर्वाचन अधिकाऱ्याने त्याला, तशी विनंती केली असता, मतदार नोंदणी अधिकाऱ्याला मतदार याद्या तयार करण्याच्या व सुधारण्याच्या संबंधातील कोणतीही कामे करण्यासाठी जरूर असेल असा कर्मचारीवर्ग उपलब्ध करून देईल. ]

दिवाणी न्यायालयांच्या अधिकारितेला आडकाठी असणे.

**३०.** कोणत्याही दिवाणी न्यायालयाला—

(क्) कोणतीही व्यक्ती एखाद्या मतदारसंघाच्या मतदार यादीत नोंदली जाण्यास हक्कदार आहे किंवा नाही हा प्रश्न विचारार्थ स्वीकारण्याची किंवा त्यावर अभिनिर्णय देण्याची ; किंवा

(ख्) मतदार नोंदणी अधिकाऱ्याने किंवा त्याच्या प्राधिकारान्वये केलेल्या कोणत्याही कारवाईची किंवा अशा कोणत्याही यादीच्या सुधारणेसाठी या अधिनियमाखाली नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही प्राधिकरणाने दिलेल्या कोणत्याही निर्णयाची वैधता प्रश्नास्पद करण्याची,

अधिकारिता असणार नाही.

[५][[६][ खोटी अधिकथने करणे.

**३१.** जर कोणत्याही व्यक्तीने—

(क्) मतदार यादी तयार करणे, सुधारणे किंवा दुरुस्त करणे, अथवा

(ख्) मतदार यादीत कोणतीही नोंद समाविष्ट करणे किंवा तीतून ती वगळणे,

या संबंधातील जी गोष्ट खोटी असून ती खोटी असल्याचे तिला ज्ञात असेल किंवा तसे ती समजत असेल किंवा जी खरी असल्याचे तो समजत नसेल त्या गोष्टीबाबत लेखी निवेदन किंवा अभिकथन केले तर, ती एका वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल. ]

१. १९६० चा अधिनियम २०, कलम ३ द्वारे खंड (घ्) गाळला.
२. १९५६ चा अधिनियम २. कलम २४ द्वारे खंड (ज्) ऐवजी समाविष्ट केले.
३. १९७६ चा अधिनियम ८८, कलम ६ द्वारे मूळ पोटकलम (३) ऐवजी समाविष्ट केले (२ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).
४. १९५६ चा अधिनियम २. कलम २५ द्वारे कलम २९ ऐवजी समाविष्ट केले.
५. १९५८ चा अधिनियम ५८, कलम ११ द्वारे दाखल केले.
६. १९६० चा अधिनियम २०, कलम ४ द्वारे कलम ३१ ऐवजी समाविष्ट केले.

**मतदार याद्या तयार करणे, इत्यादींच्या संबंधातील पदीय कर्तव्याचा भंग.**

**३२.** (१) जर कोणतीही मतदार नोंदणी अधिकारी किंवा सहायक मतदार नोंदणी अधिकारी अथवा या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली मतदार यादी तयार करणे, सुधारणे किंवा दुरुस्त करणे, अगर त्या यादीत कोणतीही नोंद समाविष्ट करणे किंवा तीतून ती वगळणे या कामांच्या संबंधातील कोणतेही पदीय कर्तव्य करणे जिला आवश्यक करण्यात आले अशी अन्य व्यक्ती वाजवी कारणाशिवाय अशा पदीय कर्तव्याचा भंग करणारी कोणतीही कृती किंवा अकृती केल्याबद्दल दोषी ठरली तर, ती व्यक्ती [१][तीन महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतु दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास आणि दंडास ] पात्र होईल.

(२) अशा कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा अन्य व्यक्तीच्या विरुद्ध पूर्वोक्त अशा कोणत्याही कृतीच्या किंवा अकृतीच्या बाबत कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

(३) निवडणूक आयोगाच्या किंवा संबंधित राज्याच्या प्रमुख निर्वाचन अधिकाऱ्याच्या आदेशावरून किंवा त्याच्या प्राधिकाराअन्वये तक्रार करण्यात आल्याशिवाय कोणतेही न्यायालय पोट-कलम (१) खाली शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याची दखल घेणार नाही. ]

## [२][ पहिली अनुसूची

(कलम ३ पहा)

**लोकसभेतील जागांचे वाटप**

| राज्याचे/संघ राज्यक्षेत्रांचे नाव | १ जानेवारी १९७३ रोजी जशी घटित झाली होती तशा लोकसभेतील जागांची संख्या | | | मागाहून जशी घटित झाली तशा लोकसभेतील जागांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | अनुसूचित जातींसाठी राखीव | अनुसूचित जनजातींसाठी राखीव | एकूण | अनुसूचित जातींसाठी राखीव | अनुसूचित जनजातींसाठी राखीव |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| **एक : राज्ये :** | | | | | | |
| १. आंध्र प्रदेश .. | ४१ | ६ | २ | ४२ | ६ | २ |
| [३][२. अरुणाचल प्रदेश ...] | | १ | .. | १ | २ | .. |
| [४][३.] आसाम .. | १४ | १ | २ | १४ | १ | २ |
| [४][४.] बिहार .. | ५३ | ७ | ५ | ५४ | ८ | ५ |
| [५][५. गोवा .. | .. | .. | ... | २ | .. | ...] |
| [६][६.] गुजरात .. | २४ | २ | ३ | २६ | २ | ४ |
| [६][७.] हरयाणा .. | ९ | २ | ... | १० | २ | ... |
| [६][८.] हिमाचल प्रदेश | ४ | १ | ... | ४ | १ | ... |
| [६][९.] जम्मू व काश्मीर ... | | ६ | .. | ... | ६ | .. |
| [६][१०.] कर्नाटक .. | २७ | ४ | ... | २८ | ४ | .... |
| [६][११.] केरळ .. | १९ | २ | ... | २० | २ | ... |
| [६][१२.] मध्य प्रदेश ... | ३७ | ५ | ८ | ४० | [७][६] | [८][९] |
| [६][१३.] महाराष्ट्र .. | ४५ | ३ | ३ | ४८ | ३ | [९][४] |
| [६][१४.] मणिपूर .. | २ | .. | १ | २ | .. | १ |
| [६][१५.] मेघालय .. | २ | .. | २ | २ | .. | ... |
| [१०][१६.] मिझोराम .. | १ | .. | १ | १ | .. | १] |

१. १९९६ चा अधिनियम २१, कलम २ (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१ ऑगस्ट, १९९६ रोजी व तेव्हापासून).
२. १९७६ चा अधिनियम ८८, कलम ७ द्वारे पहिल्या अनुसूचीऐवजी ही अनुसूची समाविष्ट केली (२ सप्टेंबर, १९७६ रोजी व तेव्हापासून).
३. १९८६ चा अधिनियम ६९, कलम ८ द्वारे दाखल केले (२० फेब्रुवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).
४. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे नवीन क्रमांक देण्यात आला (२० फेब्रुवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).
५. १९८७ चा अधिनियम १८, कलम ८ द्वारे दाखल केले (३० मे, १९८७ रोजी व तेव्हापासून).
६. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे नवीन क्रमांक देण्यात आला (३० मे, १९८७ रोजी व तेव्हापासून).
७. अधिसूचना क्रमांक स्थायी आदेश ३५६७ दिनांक १६ ऑक्टोबर, १९७९ ' ५ ' ऐवजी दाखल केले.
८. वरील अधिसूचनेद्वारे " ८ " ऐवजी दाखल केले.
९. अधिसूचना क्रमांक स्थायी आदेश ३५ (ङ) दिनांक २१ जानेवारी, १९७८ द्वारे ' ३ ' ऐवजी दाखल केले.
१०. १९८६ चा अधिनियम ३४, कलम ८ द्वारे समाविष्ट केले (२० फेब्रुवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

**पहिली अनुसूची---(चालू)**

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| [१][१७.] नागालँड .. | १ | .. | ... | १ | .. | ... |
| [१][१८.] ओरिसा .. | २० | ३ | ५ | २१ | ३ | ५ |
| [१][१९.] पंजाब .. | १३ | ३ | ... | १३ | ३ | ... |
| [१][२०.] राजस्थान .. | २३ | ४ | ३ | २५ | ४ | ३ |
| [१][२१.] सिक्कीम .. | .. | ... | ... | १ | ... | ... |
| [१][२२.] तामिळनाडू .. | ३९ | ७ | ... | ३९ | ७ | ... |
| [१][२३.] त्रिपुरा .. | २ | ... | १ | २ | ... | १ |
| [१][२४.] उत्तर प्रदेश .. | ८५ | १८ | ... | ८५ | १८ | ... |
| [१][२५.] पश्चिम बंगाल .. | ४० | ८ | २ | ४२ | ८ | २ |
| **दोन : संघ राज्यक्षेत्रे :** | | | | | | |
| [१.] अंदमान व निकोबार बेटे. | १ | ... | ... | १ | ... | ... |
| [२]* .. | * | * | * | * | * | * |
| [३][२.] चंदिगड .. | १ | ... | ... | १ | ... | ... |
| [३][३.] दादरा व नगर हवेली. | १ | ... | १ | १ | ... | १ |
| [३][४.] दिल्ली .. | ७ | १ | ... | ७ | १ | ... |
| [४][५.] दमण व दीव .. | १ | ... | ... | १ | ... | ... |
| ६. लखदीव .. | १ | ... | १ | १ | ... | ६ |
| [५]* .. | * | * | * | * | * | * |
| [६][७.] पाँडेचेरी .. | १ | ... | ... | १ | ... | ... |
| एकूण .. | ५२२ | ७७ | ४१ | ५४३ | ७९ | ४१ |

## दुसरी अनुसूची

(कलमे ७ व ७क पहा)

**विधानसभांमधील जागांची एकूण संख्या**

| राज्याचे/संघ राज्यक्षेत्रांचे नाव | १ जानेवारी १९७३ रोजी जशी घटित झाली तशा विधानसभेतील जागांची संख्या | | | मागाहून जशी घटित झाली तशा विधानसभेतील जागांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | अनुसूचित जातींसाठी राखीव | अनुसूचित जनजातीं-साठी राखीव | एकूण | अनुसूचित जातींसाठी राखीव | अनुसूचित जनजातीं-साठी राखीव |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| **एक : राज्ये :** | | | | | | |
| [१. आंध्र प्रदेश .. | २८७ | ४० | ११ | २९४ | ३९ | १५ |
| [७][२. अरुणाचल प्रदेश | .. | ... | ... | ६० | ... | ५९] |
| [३. आसाम .. | ११४ | ८ | १० | १२६ | ८ | १६ |
| [४. बिहार .. | ३१८ | ४५ | २९ | ३२४ | ४८ | २८ |

१. १९८६ चा अधिनियम ३४, कलम ८ द्वारे नवीन क्रमांक देण्यात आला (२० फेब्रुवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. १९८६ चा अधिनियम ६९, कलम ८ द्वारे अरुणाचल प्रदेश संबंधीची नोंद गाळली (२० फेब्रुवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे नवीन क्रमांक देण्यात आला (दिनांक २० मार्च, १९८७ रोजी व तेव्हापासून).

४. १९८७ चा अधिनियम १८, कलम १२ द्वारे गोवा, दमण व दिव ऐवजी दाखल केले (३० मे, १९८७ रोजी व तेव्हापासून).

५. १९८६ चा अधिनियम ३४, कलम ८ द्वारे मिझोराम संबंधीची नोंद गाळली (२० फेब्रुवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे नवीन क्रमांक देण्यात आला (२० फेब्रुवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

७. १९८६ चा अधिनियम ६९, कलम १० द्वारे समाविष्ट करण्यात आले (२० फेब्रुवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

दुसरी अनुसूची---(चालू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| [१][५. गोवा .. | ३० | ... | ... | ४० | १ | ...] |
| ६. गुजरात .. | १६८ | ११ | २२ | १८२ | १ | २६ |
| ७. हरयाणा .. | ८१ | १५ | ... | ९० | १७ | ... |
| ८. हिमाचल प्रदेश | ६८ | १६ | ३ | ६८ | १६ | ३ |
| ९. जम्मू व काश्मीर | * | ७५ | ६ | ... | *७६ | ६ |
| ... | | | | | | |
| १०. कर्नाटक .. | २१६ | २९ | २ | २२४ | ३३ | २ |
| ११. केरळ .. | १३३ | ११ | २ | १४० | १३ | १ |
| १२. मध्य प्रदेश .. | २९६ | ३९ | ६१ | ३२० | ४४ | ७५ |
| १३. महाराष्ट्र .. | २७० | १५ | १६ | २८८ | १८ | २२ |
| १४. मणिपूर .. | ६० | १ | १९ | ६० | १ | १९ |
| १५. मेघालय .. | ६० | .. | ५० | ६० | ... | ५५*** |
| [२][१६. मिझोराम .. | ३० | ... | ... | ४० | ... | ३९] |
| १७. नागालँड .. | ५२ | ... | ... | ६० | ... | ५९ |
| १८. ओरिसा .. | १४० | २२ | ३४ | १४७ | २२ | ३४ |
| १९. पंजाब .. | १०४ | २३ | ... | ११७ | २९ | ... |
| २०. राजस्थान .. | १८४ | ३१ | २१ | २०० | ३३ | २४ |
| २१. सिक्कीम .. | ... | ... | ... | ३२ | २ | १२** |
| २२. तामिळनाडू .. | २३४ | ४२ | २ | २३४ | ४२ | ३ |
| २३. त्रिपुरा .. | ६० | ६ | १९ | ६० | ७ | १७ |
| २४. उत्तर प्रदेश .. | ४२५ | ८९ | ... | ४२५ | ९२ | १ |
| २५. पश्चिम बंगाल .. | २८० | ५५ | १६ | २९४ | ५९ | १७ |
| **दोन : संघ राज्यक्षेत्रे :** | | | | | | |
| ३* | * | * | * | * | * | * |
| ४* | * | * | * | * | * | * |
| ५* | * | * | * | * | * | * |
| ४. पाँडेचेरी | ३० | ५ | ... | ३० | ५ | ...] |

*जम्मू व काश्मीरच्या संविधानान्वये, पाकिस्तानव्याप्त क्षेत्राकरता राखून ठेवण्यात आलेल्या २४ जागा वगळता, त्या राज्याच्या विधानसभेतील जागांची संख्या ७६ असून, त्यांपैकी ६ जागा 'जम्मू व काश्मीर लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५७' अनुसार, अनुसूचित जातींच्या व्यक्तींकरता राखून ठेवण्यात आल्या आहेत.

**संघाकरता १ जागा राखीव आणि 'भूतिया लेपचा' करता १२ जागा राखीव.

***आता ५५ जागा, १९८७ चा अधिनियम ४०, कलम २ द्वारे दाखल केलेले या अधिनियमाचे कलम ७ (१ख) पहा.

१. १९८७ चा अधिनियम १८, कलम १२ द्वारे समाविष्ट केले (३० मे, १९८७ रोजी व तेव्हापासून).
२. १९८६ चा अधिनियम ३४, कलम १० द्वारे समाविष्ट केले (२९ फेब्रुवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).
३. १९८६ चा अधिनियम ६९, कलम १० द्वारे अरूणाचल प्रदेश संबंधीची नोंद गाळली (२० फेब्रुवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).
४. १९८७ चा अधिनियम १८, कलम १२ द्वारे गोवा, दमण व दीव संबंधीची नोंद गाळली (३० मे, १९८७ रोजी व तेव्हापासून).
५. १९८६ चा अधिनियम ३४, कलम ८ द्वारे मिझोराम संबंधीची नोंद गाळली (२० फेब्रुवारी, १९८७ रोजी व तेव्हापासून).

## [१][ तिसरी अनुसूची

(कलम १० पहा)

**विधानपरिषदांतील जागांचे वाटप**

| राज्याचे नाव | जागांची एकूण संख्या | अनुच्छेद १७१ (३) खाली निवडून द्यावयाच्या किंवा नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या उपखंड (क्) | उपखंड (ख्) | उपखंड (ग्) | उपखंड (घ्) | उपखंड (ङ्) |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| [२]* * * | * | * | * | * | * | * |
| २. बिहार . . . . | ९६ | ३४ | ८ | ८ | ३४ | १२ |
| [३]* * * | * | * | * | * | * | * |
| [४][३.] मध्य प्रदेश . . . . | ९० | ३१ | ८ | ८ | ३१ | १२ |
| [५]* * * | * | * | * | * | * | * |
| [६][५. महाराष्ट्र . . . . | ७८ | २२ | ७ | ७ | ३० | १२] |
| [७][६. [८][कर्नाटक] . . . . | ७५ | २५ | ७ | ७ | २५ | ११] |
| [९]* * * | * | * | * | * | * | * |
| ८. उत्तर प्रदेश . . . . | १०८ | ३९ | ९ | ९ | ३९ | १२ |
| [१०]* * * | * | * | * | * | * | *] |

## चौथी अनुसूची

[कलम २७ (२) पहा]

**विधानपरिषदांच्या निवडणुकींच्या प्रयोजनासाठी स्थानिक प्राधिकरणे**

[ [११]* * * * * * * * *

**बिहार**

१. नगरपालिका.

२. जिल्हा मंडळे.

३. कटक मंडळे.

४. अधिसूचित क्षेत्र समित्या.

---

१. १९५७ चा अधिनियम क्रमांक ३७, कलम १२ द्वारे तिसऱ्या अनुसूची ऐवजी ही अनुसूची दाखल केली.

२. १९८५ चा अधिनियम ३४, कलम ५ द्वारे आंध्र प्रदेश संबंधीची नोंद गाळली (१ जून, १९८५ रोजी व तेव्हापासून).

३. १९६० चा अधिनियम ११, कलम २१ द्वारे मुंबई संबंधीची नोंद गाळली (१ मे, १९६० रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम २१ द्वारे नवीन क्रमांक देण्यात आला (१ मे, १९६० रोजी व तेव्हापासून).

५. १९८६ चा अधिनियम ४०, कलम ५ द्वारे तामिळनाडू संबंधीची नोंद गाळली (१ नोव्हेंबर, १९८६ रोजी व तेव्हापासून).

६. १९६० चा अधिनियम ११, कलम २१ द्वारे समाविष्ट केले (१ मे, १९६० रोजी व तेव्हापासून).

७. १९८७ चा अधिनियम ३१, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

८. "म्हैसूर राज्य (नामांतर) (संघसूचीतील विषयांवरील कायद्याचे अनुकूलन) आदेश, १९७४, कलम ३ व अनुसूची याद्वारे "म्हैसूर" याऐवजी दाखल केले (१ नोव्हेंबर १९७३ रोजी व तेव्हापासून).

९. १९६९ चा अधिनियम ४६, कलम ५ द्वारे पंजाब संबंधीची नोंद गाळली (७ जानेवारी, १९७० रोजी व तेव्हापासून).

१०. १९६९ चा अधिनियम २०, कलम ५ द्वारे पश्चिम बंगाल संबंधीची नोंद गाळली (१ ऑगस्ट, १९६९ रोजी व तेव्हापासून).

११. १९८५ चा अधिनियम ३४, कलम ५ द्वारे "आंध्र प्रदेश" हे शीर्षक आणि त्याखालील नोंदी गाळल्या (१ जून, १९८५ रोजी व तेव्हापासून).

**बिहार---(चालू)**

[१][५. जिल्हा परिषदा.

६. पंचायत समित्या. ]

[२]* * * * * *

[३][ **मध्य प्रदेश**

[४][१. नगरपालिका.

२. जनपद सभा.

३. मंडल पंचायती.

४. कटक मंडळे.

५. अधिसूचित क्षेत्र समित्या.

६. नगर क्षेत्र समित्या. ] ]

[५]* * * * * *

[६][ **महाराष्ट्र**

[७][१. नगरपालिका.

२. कटक मंडळे.

[८]* * * * * *

४. जिल्हा परिषदा. ] ]

[९][ **कर्नाटक**

१. शहर महानगरपालिका.

२. शहर नगरपरिषद.

३. नगर परिषदा.

४. नगर पंचायत.

५. जिल्हा पंचायत.

६. तालुका पंचायत.

७. ग्रामपंचायत.

८. कटक मंडळे. ]

---

१. १९६३ चा अधिनियम २, कलम २ द्वारे समाविष्ट केले. १९५६ चा अधिनियम २, कलम २६ द्वारे मूळ बाब क्रमांक ५ गाळली होती.

२. १९६१ चा अधिनियम ४०, कलम ६ द्वारे "मुंबई" (म्हणजे महाराष्ट्र) हे शीर्षक आणि त्याखालील नोंदी गाळल्या (२० सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून).

३. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ द्वारे समाविष्ट केले.

४. १९५७ चा अधिनियम ३७, कलम १२ द्वारे मूळ नोंदी ऐवजी दाखल केले.

५. तामिळनाडू विधानपरिषद (निरास) अधिनियम, १९८६ (१९८६ चा ४०) द्वारे तामिळनाडू हे शीर्षक आणि त्याखालील नोंदी गाळल्या (१ नोव्हेंबर, १९८६ रोजी व तेव्हापासून).

६. १९६१ चा अधिनियम ४०, कलम ६ द्वारे समाविष्ट केले (२० सप्टेंबर, १९६१ रोजी व तेव्हापासून).

७. १९६३ चा अधिनियम २, कलम २ द्वारे पूर्वीच्या नोंदी ऐवजी दाखल केले.

८. १९८९ चा अधिनियम २१, कलम ५ द्वारे नोंद "३ नगर समित्या" गाळली.

९. १९९६ चा अधिनियम २९, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१३ सप्टेंबर, १९९६ रोजी व तेव्हापासून).

**अनुसूची**—(चालू)

[1][ **उत्तर प्रदेश**

१. महानगरपालिका.

२. नगर परिषदा.

३. जिल्हा पंचायत.

४. नगर पंचायत.

५. क्षेत्र पंचायत.

६. कटक मंडळे. ]

[ **पाचवी अनुसूची** ] 'संघ राज्यक्षेत्रे अधिनियम, १९६३' (१९६३ चा २०) कलम ५७ व दुसरी अनुसूची यांद्वारे निरसित.

[ **सहावी अनुसूची** ] 'लोकप्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९५६' (१९५६ चा २) कलम २७ द्वारे निरसित.

[ **सातवी अनुसूची** ] 'लोकप्रतिनिधित्व (विशोधन) अधिनियम, १९५६' (१९५६ चा २) कलम २७ द्वारे निरसित.

---

१. १९९६ चा अधिनियम २९, कलम २ (ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१३ सप्टेंबर, १९९६ रोजी व तेव्हापासून).

## The Representation of the People Act, 1950
## लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५०
## इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| authentic | अधिप्रमाणित | [S. 8 (1)] |
| cantonment board | कटक मंडळ | [Sch. four] |
| delimitation | परिसीमन | [Preamble] |
| desing | अधीक्षण | [S. 13A (2)] |
| designate | पदनिर्देशित | [S. 13AA (1)] |
| disqualified | निरर्ह | [S. 16 (1) (c)] |
| electoral college | निर्वाचकगण | [S. 27A] |
| electorate | मतदारगण | [S. 27 (2) (a)] |
| in legal custody | वैध हवालतीत | [S. 20 (2)] |
| membership | सदस्यगण | [S. 27 (2) (d)] |
| nominate | नामनियुक्त | [S. 13AA (1)] |
| of unsound mind | विकल मनाची | [S. 16(1) (b)] |
| qualifying date | अर्हता दिनांक | [S. 14 (b)] |
| | अर्हकारी दिनांक | [S. 19 (a)] |
| service qualification | सेवाप्राप्त अर्हता | [S. 20 (8)] |
| supersede | निष्प्रभावी | [S. 8 (1)] |
| verified | सत्यापित | [S. 20 (5)] |

# लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५०

# THE REPRESENTATION OF THE PEOPLE ACT, 1950

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधिप्रमाणित | authentic | [क. ८(१)] |
| अधीक्षण | desing | [क. १३ क (२)] |
| अर्हकारी दिनांक | qualifying date | [क. १९(क)] |
| अर्हता दिनांक | qualifying date | [क. १४(ख)] |
| कटक मंडळ | cantonment board | [चौथी अनुसूची] |
| नामनियुक्त | nominate | [क. १३ कक (१)] |
| निरर्ह | disqualified | [क. १६(१)(ग)] |
| निर्वाचकगण | electoral college | [क. २७ क] |
| निष्प्रभावी | supersede | [क. ८(१)] |
| पदनिर्देशित | designate | [क. १३ कक (१)] |
| परिसीमन | delimitation | [उद्देशिका] |
| मतदारगण | electorate | [क. २७(२) (क)] |
| विकल मनाची | of unsound mind | [क. १६(१) (ख)] |
| वैध हवालतीत | in legal custody | [क. २०(२)] |
| सत्यापित | verified | [क. २०(५)] |
| सदस्यगण | membership | [क. २७(२)(घ)] |
| सेवाप्राप्त अर्हता | service qualification | [क. २०(८)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई